रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ११५
www.ramprahar.com

शनिवार, ११ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

मुंबईमध्ये प्रदूषण कमी करण्यासाठी कडक निर्बंध/२
रायगड जि.प.च्या नवीन इमारतीसाठी प्रस्ताव सादर/५
राज्य बॅडमिंटन स्पर्धेत आदिती यादव विजेती/८

## सिकंदर शेख 'महाराष्ट्र केसरी'चा मानकरी



**पुणे** : सिकंदर शेख ६६व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा विजेता ठरला आहे. गतविजेत्या शिवराज राक्षेला अस्मान दाखवत सिकंदरने कुस्तीतील हा मानाचा किताब जिंकला. पुण्यातील फुलगावमध्ये झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सिकंदरचे पारडे जड होते, तर शिवराज राक्षे त्याला आव्हान देईल असेही अनेकांना वाटत होते, मात्र वेगवान आणि आक्रमक कुस्ती खेळणाऱ्या सिकंदरपुढे शिवराजचा निभाव लागला नाही. लढत सुरू झाल्यानंतर सिकंदरने २२व्या सेकंदाला झोळी डाव घेत शिवराजला उचलून खाली घेतले आणि चीतपट करून विजय मिळवला. २२ वर्षीय सिकंदर हा कोल्हापुरातील गंगावेस तालमीतील पैलवान आहे. त्याचे मूळ गाव सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ. त्याच्या घरात आजोबांपासून कुस्तीची परंपरा आहे. घराण्याचे नाव शिवराजने उंचावले आहे.

# वडेट्टीवार वि. जरांगे-पाटील वाक्‌युद्ध!

आरक्षणावरून **संघर्ष**



**मुंबई, जालना : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांमध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा समोर आला असून यासाठी आक्रमक असलेल्या मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी कोट्यातून आरक्षण द्यावे, अशी मागणी केली आहे, तर काँग्रेस नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देण्यास विरोध दर्शविला आहे. यावरून या दोघांमध्ये शुक्रवारी (दि. १०) शाब्दिक चकमक झाली

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार आणि मनोज जरांगे-पाटील हे आमने सामने आलेले दिसले. मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देण्यास वडेट्टीवार यांनी विरोध केला. ते म्हणाले की, जरांगे-पाटलांच्या म्हणण्यावर सर्व काही ठरवू नये, अभ्यास करून तरुणांनी निर्णय घ्यावा. ज्या ठिकाणी नोकऱ्यांचा आणि सोयी, सवलती यांचा संदर्भ येतो तिथे मोठे नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत मराठा तरुणांनी अभ्यास करून आपण कोणाला साथ देत आहोत, आपले भले काय आहे याचा विचार करावा, असा सल्लाही वड्डेटीवार यांनी दिला.

यानंतर मनोज जरांगे-पाटील यांनी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांना प्रत्युत्तर दिले. विरोधी पक्षनेता आणि विधिमंडळ हे न्यायमंदिर आहे. आता त्यांना स्वत:च्या जातीविषयी गर्व झालाय. असा घटनेतला विरोधी पक्षनेता असतो का? राहुल गांधींनी हे शिकवले का? मराठ्यांविरोधात आवाज उठवतो. त्यासाठी राहुल गांधींनी पद दिलंय का, असा घणाघात जरांगे-पाटील यांनी वडेट्टीवार यांच्यावर केला.

### मराठा समाजाने ओबीसीऐवजी ईडब्ल्यूएस वर्गातून आरक्षण घ्यावे -प्रवीण गायकवाड

मराठा समाजाने ओबीसीऐवजी ईडब्ल्यूएसमधून आरक्षण घेतले, तर अधिक फायदा होईल, असे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी म्हटले आहे. सध्या ओबीसींना मिळणाऱ्या आरक्षणापैकी १८ ते १९ टक्के वाटा कुणबी समाज उचलतो. त्यामुळे मराठा समाज ओबीसीमध्ये आल्यास आरक्षणाचा खूपच कमी वाटा मराठा समाजाला मिळेल असा मुद्दा गायकवाड यांनी मांडला, मात्र आर्थिक निकषावर मिळणाऱ्या १० टक्के आरक्षणापैकी मराठा समाजाच्या वाट्याला आठ ते साडेआठ टक्के वाटा येत असल्याचे दिसतेय, असे गायकवाड म्हणाले. आर्थिक असमानता आरक्षणाच्या मागण्यांचे मूळ असून आर्थिक समस्या सोडवण्यासाठी धोरणात बदल करण्याची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# भाजपच्या नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा आज सत्कार समारंभ

## मंत्री रवींद्र चव्हाण, लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लाभणार प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने घवघवीत यश संपादन केले आहे. त्या अनुषंगाने उत्तर रायगड जिल्ह्यातील नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार समारंभ उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या वतीने शनिवारी (दि. ११) सायंकाळी ५ वाजता राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस् कॉम्प्लेक्समध्ये होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर मंडल अध्यक्ष अनिल भगत, उरण तालुका मंडल अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत, खालापूर मंडल तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, खोपोली मंडल अध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.






## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भाजप पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल शहर मंडल कार्यकारिणी बैठक भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि शहराध्यक्ष अनिल भगत यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. ९) झाली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, उपाध्यक्ष कविता चौतमोल, चिटणीस ब्रिजेश पटेल, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, नीता माळी, महिला मोर्चा पनवेल मंडल अध्यक्ष राजश्री वावेकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, युवा मोर्चा शहराध्यक्ष सुमित झुंजारराव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### सुकन्या समृद्धी योजनेचे पासबुक वाटप

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिका क्षेत्रात २०२३मध्ये जन्मलेल्या एक हजार मुलींना सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ देण्याचा संकल्प केला होता. त्यानुसार त्यांनी स्वखर्चाने एक हजार रुपये भरून या बालिकांचे नवीन खाते उघडले. या उपक्रमाचा लाभ घेतलेल्यांना या वेळी सुकन्या योजनेचे पासबुक तसेच खेळण्याचे वाटप करण्यात आले.



## शेतकऱ्यांची दिवाळी होणार गोड!

**पीएम किसान सन्मान निधीचे १५ नोव्हेंबरला वितरण**

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याद्वारे पीएम किसान योजनेच्या १५व्या हप्त्याचे हस्तांतरण १५ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

पीएम किसान योजना ही जगातील सर्वांत मोठ्या डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (सरकारी लाभ थेट त्या व्यक्तीच्या खात्यात) योजनांपैकी एक आहे, ज्यामध्ये वार्षिक तीन हप्त्यांमध्ये सहा हजार रुपये पात्र शेतकऱ्यांच्या आधार कार्डशी जोडलेल्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केले जातात. १५व्या हप्त्याचे दोन हजार रुपये आठ कोटी १५ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित केले जातील.

## महाड दुर्घटनेतील मृतांची ओळख पटली

**अलिबाग** : महाड एमआयडीसीतील ब्ल्यू जेट हेल्थ केअर कंपनीमध्ये ३ नोव्हेंबर रोजी स्फोट होऊन आग लागली होती. या दुर्घटनेत ११ कामगार मृत्युमुखी पडले. त्यांची ओळख पटवून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

सर्व ११ मृतदेह बाहेर काढल्यानंतर त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचे डीएनए सॅम्पल घेऊन मयतांची ओळख पटविण्यात आली. मृतांमध्ये अभिमन्यू भीमरांग उराव (रा.बर्नडी, जि.बोकारो, झारखंड), जीवन कुमार चौबे/ठाकूर (रा.कुमर जगा, जि.बोकारो, झारखंड) विकास बबुल महंतो (रा.बागलमारी, जि.पुरलिया, पश्चिम बंगाल), संजय शिवाजी पवार (रा.खरवली, ता.महाड), अक्षय बाळाराम सुतार (रा. तळीये, ता.महाड), आदित्य मोरे (रा.चोचिंदे, ता.महाड), शशिकांत दत्तात्रय भुसाणे (रा.निलंगा, जि.लातूर), सोमनाथ शिवाजी वायदंडे (रा.कोरेगाव जि.सातारा), विशाल रवींद्र कोळी, (रा.शिरपूर, जि.धुळे), अस्लम महबूब शेख (रा.बेलावडे, ता.कराड, जि.सातारा) व सतीश बापू साळुंके (रा.दस्तुरीनाका, ता.महाड) यांचा समावेश आहे. हे सर्व मृतदेह अंत्यविधीसाठी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

दरम्यान, या दुर्घटनेबाबत ब्लू जेट हेल्थ केअर कंपनी व्यवस्थापनाच्या विरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून मेंटेनन्स हेड शैलेश जोशी यांना अटक करण्यात आली आहे.



**पनवेल : मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित दीपोत्सवाचे उद्‌घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी त्यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर यांची एकत्रित टिपलेली छबी.** (छाया : अक्षय शार्दुल) **अधिक छायाचित्रे पान ८ वर..**




# मुंबईत प्रदूषण कमी करण्यासाठी कडक निर्बंध

## फटाके फोडण्यास दोन तासांचा अवधी, डेब्रीज ट्रकवर पूर्ण बंदी



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर क्षेत्रातील प्रदूषणाच्या प्रश्नावर हायकोर्टात शुक्रवारी (दि. १०) सुनावणी झाली. मुंबईसह आसपासच्या परिसरात फटाके फोडण्याच्या वेळेवरील निर्बंध हायकोर्टाने वाढवले आहेत. आता केवळ रात्री ८ ते १० या वेळेतच फटाके फोडण्याची मुभा असेल. यापूर्वीची सायंकाळी ७ ते रात्री १० अशी परवानगी होती. हवेची गुणवत्ता न सुधारल्यास दिवाळीत मुंबईतील बांधकामांवर निर्बंध लावण्याचे हायकोर्टाने संकेत दिले होते. पूर्णतः बंदी नसली तरी डेब्रीज वाहतुकीवर बंदी करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह अन्य शहरांत मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण झाले आहे. त्यामुळे नारिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. याबाबत मुंबई हायकोर्टाने दाखल केलेल्या सुमोटो याचिकेवर सुनावणी करताना शुक्रवारी महत्त्वाचे निर्देश दिले. हायकोर्टाने मुंबईतील बांधकाम क्षेत्रावर तूर्तास बंदी नाही, मात्र काही निर्बंध लागू राहतील असे स्पष्ट केले. १९ नोव्हेंबरपर्यंत बांधकामातील डेब्रिज वाहून नेणाऱ्या ट्रकवर पूर्णपणे बंदी लागू करण्यात आली आहे. सामानाची ने-आण करण्यास मुभा असणार आहे, मात्र डेब्रिज वाहतुकीवर बंदी लागू असणार असल्याचे हायकोर्टाने म्हटले.

हवा गुणवत्ता निर्देशांकाबाबत संदर्भात काम करण्याकरता एक विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. या समितीमध्ये ज्यात नीरी आणि आयआयटी मुंबईतील विषयाशी संबंधित तज्ज्ञ आणि एक निवृत्त प्रधान सचिव नेमण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही समिती पालिकेच्या दैनंदिन अहवालावर काम करून आपला अहवाल दर आठवड्याला तयार करेल. हा अहवाल कोर्टात सादर होणार आहे.

मुंबई महापालिकेने याबाबत स्वतंत्र हेल्पलाईन सुरू केली आहे. त्यासोबत पालिकेची वेबसाईट, मोबईल ॲपवरही सर्व माहिती अपडेट होणे गरजेचे असल्याचे हायकोर्टाने सांगितले. याबाबतीत एमएमआर क्षेत्रातील अन्य पालिकांनीही आपला डेटा अपडेट करायला हवा असे सांगण्यात आले.


# रसायनीत अवकाळी पावसाचे धूमशान

## बळीराजा चिंताग्रस्त; शेतीवर पाणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गेले दोन दिवस रसायनीत अवकाळी पावसाचे धुमशान सुरू आहे. यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले. पावसामुळे कडप्पा भिजत असून शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

रसायनीत भातशेती पिवळी धमक झाली असल्यामुळे कापणीयोग्य झाली होती. यामुळे भातकापणी केली तर हाताला दाणा मिळेल या आशाने शेतात भातकापणीसमवेत झोडणीही सुरू करण्यात आली होती, मात्र अवकाळी पावसामुळे शेतामध्ये पाणी जमा होत असून लोंब्याला अंकुर फुटत आहे. यामुळे भाताच्या दाण्यासमवेत पेंढाही कुजत असून गुरांच्या वैरणीचा प्रश्न निर्माण झाला आहे.



# उरणच्या युईएस कॉलेजमध्ये दिवाळी उत्सव



**उरण : वार्ताहर**

युईएस स्कूल, ज्युनिअर आणि सिनिअर कॉलेजमध्ये दिवाळी उत्सव मंगळवारी (दि. ७) उत्साहात साजरा करण्यात आला. युईएस संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांच्यासोबत उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, मानद सचिव आनंद भिंगार्डे, खजिनदार चंद्रकांत ठक्कर, विश्वस्त सदस्य व माजी अध्यक्ष ॲड. राजेंद्र भानुशाली, सदस्य विश्वास दर्णे, सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका उपस्थित होत्या.

प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विदयार्थ्यांनी चित्रकला शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या कंदीलाने तसेच रंगीबेरंगी रोषणाईने संपूर्ण शाळेचा परिसर सजविण्यात आला होता, तसेच ज्यु. कॉलेजच्या शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली ज्यु. कॉलेजच्या विदयार्थ्यांनी व शिपायांनी लोहगड किल्ल्याची सुंदर अशी प्रतिकृती तयार केली होती. दिवाळीचे कंदील आणि सुबक किल्ला तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना, शिपायांना व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर सर्वांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

दिवाळी उत्सवनिमित्त युईएस. स्कूल, ज्युनिअर आणि सिनिअर कॉलेजच्या वतीने निरनिराळ्या व रंगीबेरंगी फटाक्यांची नयनरम्य अशी आतिषबाजी करण्यात आली. कार्यक्रम संपण्यापूर्वी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शाळेतर्फे दिवाळी भेट देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, स्वागत आणि आभार प्रदर्शन युईएस. परिवारातील शिक्षकांनी केले.

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

## जाहीर नोटीस

मा. पवार मॅडम कोर्ट — अर्जदारातर्फे वकील

**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मे. पवार सो. यांच्या न्यायालयात**

स्पेशल मुकादमा क्र. ४३३/२०२२, नि. ४३ड, ने.ता. २४/११/२३

**श्री. चंद्रेशकुमार त्रिवेदी .... वादी**
**विरुध्द**
**श्री. एकनाथ हरी पाटील वगैरे .... प्रतिवादी**

**प्रति,**
**श्रीमती बोम्बिडी विजयलक्ष्मी**
राहणार रुम.नं. ब - ७०१
निळसिध्दी गार्डन, गंगाराम थेअटर जवळ,
तक्का रोड पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड

ज्याअर्थी वादी राहणार प्लॉट नं. २१० पहिला माळा, फ्लॅट नं. -ए-१, ओमजयलक्ष्मी को. ऑप. प्रिमायसेस सोसायटी, सायन हॉस्पिटल समोर, सायन (पूर्व) मुंबई - ४०००२२ यांनी तुमच्या विरुध्द सोबतच्या नकलेप्रमाणे या न्यायालयात वाद दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात आपल्या जातीने किंवा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असुन जो वादीसंबंधीचे सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा प्रकारच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती त्यांचा बरोबर आले किंवा वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलवण्यात येत आहे. व तुमच्यासाठी हजेरीसाठी ठरवलेला दिवस दाव्याच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे तुमच्या बचावाच्या पृष्ठ्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदाराचा साक्षीचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेऊ इच्छीतो ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होऊन निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पुर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमच्या पत्ता दखल न केल्यास तुमच्या जबाब रद्द होणेस पात्र ठरेल.

आज दि.३ माहे नोव्हेबंर २०२३ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**क. लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधीक्षक (प्रशासन) दि.न्या.व.स्तर.पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सांगण्यावरून मी **कै.कृष्णा तुकाराम म्हात्रे मयत तर्फे वारस श्री बाळीराम कृष्णा म्हात्रे** रा. ६०४, दत्त मंदिर, चिरनेर रायगड ४१०२०६ (जमिन मालक) यांचे खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील ('सदर मिळकत) स्वामित्व हक्क तपासात आहे.

तरी सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत आगर तिचे हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा इसम/ इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा व/किंवा, कोणत्याही कराराद्वारे मागणी, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, कुळ, पोटकुळ, लिज, सबलिज, गहाण (ईक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षीस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, दान, ताबा, कब्जा, ईजमेंट, असाईनमेंट, लायसन्स, निशाणी (डीवाईस), डिमाईस, वाटप, प्लेज, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, सह उद्योग, भागीदारी, सहयोग, कर्ज, आगाऊ देणे, भुसंपादन, लेखी मागणी, बोजा, एफएसआय/ टीडीआर हक्क / वापर, मनाई किंवा इतर ऑटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा अधिकाऱ्यांचा, न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅट्यूटरी) अधिकाऱ्यांचा, प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हुकूमनामा, आदेश, ऑवॉर्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहिवाट आगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क, असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती संबंधी दावा/ दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल.

**मिळकतीचे वर्णन**
**परिशिष्ट मौजे चिरनेर, ता उरण व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १४९ | ३ | ०-४४-७०<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकूण ०-४८-२०<br>**पैकी ०-२४-१०** | ८.६३ |

दिनांकः ११/११/२०२३

**सही /-**
**ॲड. वृषाली नायर**
फ्लॅट न. १६, दूरवाणि सी.एच.एस., वामन राव पै मार्ग, सेक्टर ६, सी.बी.डी. बेलापूर ४००६१४. मोबाईल नं. ९१३७१३३९१८.

# कोमसापतर्फे दिवाळी पहाट कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

दिपावली उत्सवाचे औचित्य साधून कोकण मराठी साहित्य परिषद माणगाव शाखेच्या वतीने शनिवारी (दि. ११) कुणबी भवन येथे सकाळी ५:३० ते ८:३० या वेळेत दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

स्थानिक कलाकार, साहित्यिक या कार्यक्रमात सहभागी होऊन आपली कला सादर करणार आहेत.

सर्व रसिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन कोमसाप माणगाव शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नवी मुंबई मनपातर्फे किल्ले स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियानांतर्गत नवी मुंबई पालिकेच्या वतीने किल्ले स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे.

या किल्ले स्पर्धेमध्ये मुले, युवक, नागरिक त्यांनी बांधलेल्या किल्ल्यांसोबत सेल्फी काढावा तसेच http://rb.gy/11ynws या लिंकवर शपथ घेऊन अभियानात सहभागी झाल्याचे प्रशस्तिपत्र डाऊनलोड करून घ्यावे व त्यानंतर आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट करावे. पोस्ट करताना nmmconline आणि sbmurbangov या ऑफिशियल अकाऊंटला टॅग करावे. ज्या पोस्टला सर्वाधिक लाईक्स मिळतील त्यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने प्रशस्तिपत्र आणि आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत.

# दिवाळीनिमित्त प्रदर्शन, विक्रीस प्रतिसाद

**मुंबई** : महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत मंत्रालयात दिवाळीनिमित्त विविध उत्पादनांच्या प्रदर्शन आणि विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. उत्कृष्ट कामगिरीसाठी महिलांना प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात आले.

मंत्रालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित पणती सजावट स्पर्धेस उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात दिवाळीनिमित्त महिला बचत गटांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री करण्यात येत आहे. १० स्टॉल असून २० महिलांचा यामध्ये सहभाग आहे.

पान १ वरुन

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भाजप पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

या वेळी बोलताना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले की, सगळ्यांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे, तर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी, संघटनेसाठी जास्तीत जास्त वेळ देऊन संघटना मजबूत करण्यासाठी काम करावे, असे आवाहन केले.

या वेळी उद्योजिका रिया प्रितम म्हात्रे यांच्या वतीने दिवाळीच्या निमित्ताने उटण्याचे वाटप करण्यात आले.

## जाहीर नोटीस

प्रोसेस फी जमा रू. अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

दिवाणी चौकशी अर्ज नं.४९९/२०२३

**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात**

नि. ८/ड

श्रीमती बबिता शाहाजी दबड़े .......... **अर्जदार**
**विरूध्द**
श्री. संतोष शहाजी दबडे, व इतर १ ........... **जाबदार**

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

१) ज्याअर्थी, के प्रशहाजी भिकू दबडे, रा. मानसरोवर कॉप्लेक्स, बिल्डींग नं. १२ बी, रूम नं. ३०३, मानसरोवर रेल्वे स्टेशन जवळ, सेक्टर नं. ३४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६ यांचे दिनाक २२/११/२०२० रोजी बी पी टी हॉस्पटल, वडाळा (प), ग्रेटर मुंबई, महाराष्ट्र-४०००३७ (B P T Hospital, Wadala East, Gr. Mumbai, Maharashtra-400037) येथे मयत झाले असून प्रस्तुतचे अर्जदार हया पत्नी असून आणि जाबदार कं २ मुलगा तसेच जाबदार क्रं. २ ही मुलगी त्यांचे कायदेशिर वारस आहेत.

यांनी खालील वर्णणाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अनु. क्र. | मिळकत |
|---|---|
| १ | मानसरोवर कॉप्लेक्स, बिल्डींग नं १२ बी रुम नं ३०३, मानसरोवर रेल्वे स्टेशन जवळ, सेक्टर नं. ३४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६ (367 Sq.ft. of 40.92 Sq. Miter Built up Area.) |

वरील अर्जदार हे मयत **कै. शहाजी भिकू दबडे**, यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे **कै. शहाजी भिकू दबडे,** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. १०/११/२३ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- कनिष्ठ लिपीक (कोर्टाचा शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत कै. हशा उर्फ हासू काथोड काटे उर्फ काठे व कै. रामुबाई हासू काठे मयत तर्फे वारस, १) श्री. शनिवार हासू काठे, २) श्रीमती. गणुबाई बाळाराम फडके, ३) श्रीमती. सीताबाई महादू तांबडे, ४) कै. हरिश्चंद्र हशा उर्फ हासू काटे उर्फ काठे मयत तर्फे वारस, ।) श्री. रुपेश हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, ।।) श्री. हनुमंत हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, ।।।) श्री. पंकज हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, iv) श्रीमती. हिराबाई रमेश गायकर, v) श्रीमती. शेवंता हरिश्चंद्र काटे उर्फ काठे, vi) श्रीमती. सरिता माया पावशे, vii) श्रीमती. अनिता सचिन पाटील, ५) कै. काना हशा उर्फ हासू काटे उर्फ काठे मयत तर्फे वारस, ।) श्री. दत्ता काना काटे उर्फ काठे, ।।) श्री. आनन काना काटे उर्फ काठे ।।।) श्री. सुभाष काना काटे उर्फ काठे, iv) श्रीमती. सीताबाई काना काटे उर्फ काठे ६) कै. पांडुरंग हशा उर्फ हासू काटे उर्फ काठे ।) श्रीमती. राघुबाई उर्फ राधुबाई पांडुरंग काटे उर्फ काठे, ।।) श्रीमती. सरिता गणेश कदम, ।।।) श्री. अशोक पांडुरंग काटे उर्फ काठे, iv) श्रीमती. संगीता उमेश जाधव, v) श्रीमती. मोनिका गोरख पवार, vi) श्रीमती. निकिता नंदू पावशे, ७) कै. चांगुबाई गोकुळ गोंधळी मयत तर्फे वारस ळ) श्रीमती. राघुबाई जनार्दन तांबडे, ८) कै. नागुबाई धर्मा म्हात्रे मयत तर्फे वारस, ।) श्री. पांडुरंग धर्मा म्हात्रे, ।।) श्रीमती. पदूबाई नारायण काठे, ।।।) श्रीमती. ठकुबाई भरत भाग्यवंत, यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-नितळस, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८९ | १ | ०-४४-३०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-४४-३०<br>पैकी ०-२८-०० इतके क्षेत्र | ४.६९ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/११/२०२३

**सही /-**
**ॲड. वृषाली नायर**
फ्लॅट न. १६, दूरवाणि सी.एच.एस., वामन राव पै मार्ग, सेक्टर ६, सी.बी.डी. बेलापूर ४००६१४. मोबाईल नं. ९१३७१३३९१८.

## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक ८७ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बागमांडला मोहितेवाडी सा. क्र १/५०० ते २/५०० ग्रा.मा. ६३, रस्ता तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | २२७७२८८ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| २ | प्रा. रा.मा. ४ ते रानवली वडघर जोडमार्ग सा. क्र ०/९०० ते २/०० ग्रा.मा. २३, रस्ता तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | २२७५९०८ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ३ | मैदाडी कोंड मार्ग ग्रा.मा. ६ चे डांबरीकरण करणे, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (कि.मी. ०/०० ते २/००) | २२८३५६२ | २३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ४ | कासार कोंड जोडमार्ग सा. क्र ०/०० ते ०/७०० ग्रा.मा. ८६, रस्ता तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | १९०९८२४ | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ५ | प्रा.जि.मा. ५७ ते वाकळघर ते गंगादेवी सा. क्र ०/०० ते ०/७०० ग्रा.मा. ८, रस्ता तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | १९०६०४० | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | आरवी जोडरस्ता सा. क्र ०/०० ते ०/९०० ग्रा.मा. ११३, रस्ता तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | १९०५६७८ | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | खरसई बनोटी कोड ते राज्यामार्ग क्र. ९८ ग्रा.मा.७ सा. क्र ०/०० ते १/०० रस्ता तयार करणे. तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | १९०९२७७ | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | प्रा. रा.मा. ४ ते हादगाव पास्तेआळी मार्ग ग्रा.मा. ४७ डांबरीकरण करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | १९१३५२० | २०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | कणघर जोडमार्ग ग्रा.मा. १०१ सा. क्र ०/०० ते ०/८००, रस्ता तयार करणे. तालुका म्हासळा, जिल्हा रायगड. | १५२८९९२ | १६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | भ्रडखोल चकरी बंदर रस्ता सा. क्र ०/२०० ते ०/८०० ग्रा.मा. ९९, रस्ता तयार करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | १५२३३९९ | १६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१३/११/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२०/११/२०२३** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. **२२/११/२०२३** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५२१३**
**दिनांक : ०९/११/२०२३**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# प्रदूषणविरहित दिवाळीसाठी पनवेल महापालिकेची सायकल रॅली

## फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत नागरिकांनी प्रदूषण विरहित व फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि. १०) देवाळे तलाव ते वडाळे तलाव अशी सायकल रॅली काढण्यात आली.



या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, पालिका अधिकारी व कर्मचारी, बायसिकल मेयर सुधीर चाकोले, रनथॉन सायकलिंग क्लबचे प्रमुख पुरणसिंग उपस्थित होते. नागरिकांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश या सायकल रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला. या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले. नागरिकांनी कमी आवाजाचे फटाके उडवावेत व जास्त प्रदूषण निर्माण करणारे फटाके उडवू नयेत, पर्यावरणपूरक दिवाळीची आपण सुरुवात करूया म्हणजे आपल्या पुढच्या पिढीला त्रास कमी होईल, तसेच नागरिकांनी संध्याकाळी सात ते दहा या वेळेतच फटाके उडवावेत, असे आवाहन केले.

देवाळे तलावापासून निघालेल्या या सायकल रॅलीचा शेवट वडाळे तलावापाशी करण्यात आला. यामध्ये सुमारे १०० सायकलस्वारांनी सहभाग नोंदविला. या वेळी फटाकेमुक्त दिवाळी, ग्रीन फेस्टिवल आणि प्रदूषणमुक्त दिवाळीचे बॅनर सायकलस्वारांनी आपल्या सायकलवर लावून जनजागृती केली. या सायकल रॅलीमध्ये लहानापासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी सहभाग नोंदविला.

# पनवेलमधील वाकडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या निता पाटील

## तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाकडी ग्रामपंचायतीच्या उसरपंचपदाची निवडणूक शुक्रवारी झाली. या निवडणुकीत भाजपच्या निता पाटील यांची शुक्रवारी (दि. १०) बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवनिर्वाचित उपसरपंच निता पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, वाकडीच्या सरपंच कुंदा पवार, वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील, नामदेव जमदाडे, दुंदरेच्या माजी उपसरपंच रमेश पाटील, अरुण पाटील, मंगेश पाटील, रेणुका जमदाडे, देवदचे माजी सरपंच संदिप वाघमारे, काळूराम पाटील, दिनेश पाटील, पोलीस पाटील कचेरशेठ पाटील, सदस्य प्रभावती खुटले, संतोष पाटील, गणेश खुटले, जनार्धन पाटील, नारायण पाटील, बाळू पाटील, धनंजय पाटील, कृष्णा जमदाडे, इसाक शेख, बाळू म्हात्रे, हिरामण पाटील गोटीराम पाटील, प्रल्हाद खुटले, यशवंत खुटले, जनार्धन म्हात्रे, प्रकाश पाटील, पद्माकर म्हस्कर, गणेश पाटील, मधुकर पाटील, युवा नेते शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# भाजप कळंबोली मंडल कार्यकारिणी जाहीर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री रवींद्र चव्हाण, मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या आदेशानुसार कळंबोली शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी कळंबोली मंडल कार्यकारिणी जाहीर केली आहे.

या कार्यकारिणीत सरचिटणीसपदी दिलीप बिष्ट, संजय दोडके; उपाध्यक्षपदी संदीप भगत, विनोद बोरसे, सुनील ढेंबरे, जोहेब पटेल, मोनिका महानवर, प्रियंका पवार; सचिव संतोष गायकवाड, तुषार जगदाळे, राजेंद्र बागल, प्रकाश मुंबईकर, आबासाहेब घुटुकडे, बायजा बारगजे; कोषाध्यक्ष प्रमिला पाटील; महिला मंडळ समिती अध्यक्ष मनिषा निकम, युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष गौरव नाईक, उत्तर भारतीय सेल शहर कमिटी संयोजक केशवलाल यादव, शहर साऊथ इंडियन आघाडी संयोजक अजय आर्या, शहर मंडळ अनुसूचित मोर्चा अध्यक्ष विष्णू गायकवाड, भटके विमुक्त आघाडी मंडल कमिटी अध्यक्ष मधुकर जाठोत, सांस्कृतिक सेल संयोजक श्रद्धा केमनाईक, शहर शिक्षक सेल मंडल समिती संयोजक कृष्णा हजारे, शहर व्यापारी सेल मंडल समिती संयोजक संजय धनासुरे, मंडल सोशल मिडिया सेल संयोजक संकेत सावंत, शहर मंडळ उत्तराखंड प्रकोष्ट सेल संयोजक गबर सिंग पनवार, शहर ट्रान्सपोर्ट मंडळ सेल संयोजक दत्ता बिनवडे, शहर मंडह कामदार आघाडी संयोजक उदय गायकवाड, शहर मंडळ ओबीसी मोर्चा संयोजक जनार्दन पाटील, शहर मंडळ वैद्यकीय सेल संयोजक डॉ. सागर पाटील, शहर मंडळ झोपडपट्टी सेल संयोजक गोरख शर्मा, शहर मंडळ अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष अझर चाँदपाशा शेख, शहर मंडळ आदिवासी मोर्चा अध्यक्ष राकेश नाईक, शहर दिव्यांग सेल संयोजक दत्तात्रय भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## 'दिवाळी साहित्य विक्री फुटपाथवर करू नये'

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळी सणाच्या कालावधीत व्यावसायिकांनी साहित्याची विक्री सार्वजनिक रहदारीचे रस्त्यावर अथवा फुटपाथवर करू नये, असे आवाहन कळंबोली वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक हरीभाऊ बानकर यांनी केले आहे.

खरेदीकरीता येणारी वाहने मुख्य रस्त्यावर पार्क करण्यात येत असल्याने तसेच काही व्यापारीदेखील फुटपाथ व त्यालगत असलेल्या रोडवर त्यांचे साहित्य विक्री करीत असल्याने सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण होवून वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे साहित्याची विक्री रस्त्यावर अथवा फुटपाथवर करू नये, तसेच कळंबोली वाहने एमएसईबीलगत असलेल्या भूखंडावर, पार्क करावीत. कामोठेतील वाहने ही पोलीस ठाणेसमोरील भूखंडावर पार्क करावीत, असे त्यांनी सांगितले आहे.





पनवेल : तालुक्यातील चिखले ग्रामपंचायतीमध्ये विजयी झालेले सदस्य पूजा पाटील, निलेश भोपी यांनी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली. त्यांनी नवनिर्वाचित सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहराध्यक्ष अनिल भगत, भालचंद्र पाटील, जयदास पाटील, सूर्यकांत पाटील, दिनेश पाटील, मंगेश पाटील, मच्छिंद्र पाटील, जान्हवी पाटील, प्रतीक्षा पाटील, तनुजा पाटील उपस्थित होते.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दै. पुण्यनगरी दिवाळी अंक भेट देत दिवाळीच्या शुभेच्छा देताना दै. पुण्यनगरीचे जाहिरात व्यवस्थापक राजेश खेडेकर आणि पनवेल तालुका प्रतिनिधी साहिल रेळेकर.



पनवेल : दिवाळीनिमित्त म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव, विभागीय अध्यक्ष शैलश गायकवाड यांनी शुक्रवारी मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. या वेळी दत्तगुरू म्हात्रे, संजय जाधव, मुकेश वाघेला, कैलास जाधव, सचिन मोहकर, आदेश गायकवाड, संदीप पगडे, किरण मोहिते, संदीप पवार, विक्की जले, मदन सागडे, रामा भोईटे, प्रफुल्ल घरत यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये आज 'दिवाळी पहाट'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल शहरातील वडाळे तलाव येथे शनिवारी (दि. ११) पहाटे ५.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे.



दरवर्षी संगीत रसिकांचा दिवाळी पहाट कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असतो. यंदा 'दिवाळी पहाट'चे सातवे वर्ष असून यामध्ये झी मराठी लिटिल चॅम्प फेम आर्या आंबेकर ही प्रसिद्ध गायिका सुश्राव्य गाण्यांची मैफिल सादर करणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून प्रवेशिकेसाठी अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३), रोहित जगताप (८६९१९३०७०९), अभिषेक भोपी (९८२०७०२०४३) किंवा अक्षय सिंग (९८२०८३८८५१) यांच्याशी संपर्क साधावा तसेच या सुरेल मैफलीचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.



## साई वर्ल्ड सिटी इमारत आग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील पळस्पे फाटा येथे नव्यानेच उभारलेल्या साई वर्ल्ड सिटी इमारत संकुलातील एका इमारतीच्या १८व्या मजल्यावरील एका घरात शुक्रवारी (दि. १०) अचानकपणे लागलेल्या आगीत त्या घराचे नुकसान झाले आहे.



साई वर्ल्ड सिटी इमारत संकुलातील एका इमारतील १८व्या मजल्यावर असलेल्या ब्लॉकमधील रहिवाशी घराबाहेर पडत असताना अचानकपणे आग लागली व आगीचे लोण बाहेर पडताच नागरिकांनी तातडीने पनवेल अग्निशामक दलाला कळवले व काही वेळातच पनवेल महापालिका व सिडको अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी पोहचून त्यांनी आग आटोक्यात आणली.

या आगीत घरातील सामानाचे मोठे नुकसान झाले आहेत. आग कश्यामुळे लागली आहे याचे कारण अद्यापही समजू शकले नाही.



पनवेल : तालुक्यातील कुंडेवहाळ ग्रामपंचायतीच्या सततच्या पाठपुराव्यामुळे ग्रामपंचायत हद्दीतील दंडाचीवाडी येथील नागरिकांना नॅशनल हायवे ओलांडण्यासाठी पादचारी पुलाच्या कामाला नॅशनल हायवे अथोरिटी ऑफ इंडियाकडून मंजुरी देण्यात आली आहे. येत्या १५ दिवसांत या पुलाचे काम सुरू होणार असल्याचे प्रोजेक्ट डायरेक्टर यशवंत यांनी सांगितले. या वेळी सरपंच सदाशिव वास्कर, उपसरपरंच संगीता पाटील, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रेय पाटील, विनोद भोईर, ऋषिकेश वास्कर, करिश्मा वास्कर, जागृती वास्कर, यशोदा कातकरी, आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक प्रवीण काळबागे, भाजप उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर यांच्यासह आदिवासी बांधव उपस्थित होते.

# आदिवासी विद्यार्थ्यांनी बनविले टाकाऊ वस्तूंपासून आकाशकंदिल

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील चिरनेर येथील अनुदानित आश्रम शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक रंगीबेरंगी आकाशकंदिल बनवून आपल्या अंगभूत कलागुणांना वाव देण्याचा साजेसा प्रयत्न केला आहे. तिसरीच्या वर्गातील ४६ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता.

दरम्यान आपल्या मुलांची कला नजरेतून पहाण्यासाठी बुधवारी (दि. ८) मुलांच्या पालकांनी आश्रमशाळेला भेट दिली आणि मुलांचे तोंड भरून कौतुक केले. आश्रमशाळेचे शिक्षक महादेव डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांकडून दिवाळीसाठी आकाशकंदिल बनवून घेतले आहेत.

या आश्रमशाळेत मुख्याध्यापक आप्पासाहेब मोरे यांच्या नेतृत्वाखाली, नवनवीन उपक्रम राबविले जात आहेत. आश्रमशाळेतील महादेव डोईफोडे यांनी विद्यार्थ्यांच्या अशिक्षित पालकांना लिहिता वाचता यावे, यासाठीदेखील त्यांनी विद्यार्थ्यांच्या पालकांना शिक्षणाचे धडे देण्याची सुरुवात केली आहे.



हे पालक आता अंगठ्याच्या जागी सही करू लागले आहेत. नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे या आश्रमशाळेत उरण, पनवेल, पेण तालुक्यातील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिक्षण घेत आहेत.

## संपादकीय

# विवेकदीप उजळी

दिवाळीच्या निमित्ताने शहरे आणि महानगरांमधील व्यापारपेठा, मॉल लक्ष लक्ष दिव्यांनी उजळले आहेत. दिवाळीची मौजमजा करताना आपण हेदेखील लक्षात ठेवले पाहिजे की आपल्या वस्तीमध्ये दिव्यांचा लखलखाट असला तरी काही वस्त्या-पाड्यांवरील झोपड्यांमध्ये अजूनही अंधार बाकी आहे. आपल्या दारापाशी लागलेल्या आकाशकंदिलाचा उजेड तिथपर्यंत पोहचायला हवा.

**दारासमोरची एक इवलीशी पणती काळोखाला रोखून धरते, तिच्या उजेडाच्या मर्यादित परिघात काळोखाला प्रवेश नाही. अशा इवल्या-इवल्या पणत्या लाखोंच्या संख्येने जेव्हा तेवू लागतात, तोच आपला दीपोत्सव. यंदाच्या दिवाळीची नांदी गुरुवारच्या वसुबारसेला गोधनाची पूजा करून झाली. शहरांमध्ये गोधनाची पूजा कशी करणार? शहरी नागरिकांची दिवाळी खऱ्या अर्थाने नरकचतुर्दशीच्या दिवशीच सुरू होते. पहिल्या आंघोळीच्या वेळी सुगंधी उटणे, सुवासिक तेल यांच्या मर्जनानंतर मोती साबणाचा गंध दरवळू लागला की मनाची खूणगाठ पटते ती दिवाळी खरोखर आपल्या घरी आली. पूर्वीच्या काळी दिवाळीच्या दिवसांत चांगलीच थंडी पडत असे. इतकी की डोक्यावर लावलेले तेल थिजून जात असे. गेल्या काही वर्षांत ही थंडी कुठे पळून गेली कोण जाणे! पहाटेच्या अंधारात अभ्यंग स्नान उरकून नवे कोरे कपडे घालून बाहेर फेरफटका मारण्याची परंपरा होती. आजही थोड्याफार प्रमाणात ही परंपरा कायम आहे. नव्या कोऱ्या कपड्यांचा तो वास फक्त दिवाळीच्या दिवसांतच हवाहवासा वाटतो. खिडकी किंवा सज्जात शानदार आकाशकंदिल दीपावलीचे स्वागत करताना दिसतो. ही लक्ष लक्ष दिव्यांची उधळण मनाला अननुभूत अशी शांतता देते. दीपावलीच्या सणाचे प्रयोजनच ते आहे. कृषी संस्कृतीतून आलेला हा महत्त्वाचा हिंदू सण. शेतीप्रधान देशातील बहुतेक सारेच सण कृषी संस्कृतीतूनच आलेले आहेत. दोन शेती हंगामांच्या बरोबर मधोमध दीपावलीचे आगमन होते. पीकपाणी मायंदाळ आल्यानंतर शेतकऱ्याच्या खिशात थोडीफार ऊब येते. या समृद्धीमुळे जिवाला थोडाफार तरी दिलासा मिळतो. दिवाळीच्या दिवसात लक्ष्मीपूजन सर्वाधिक उत्साहाने केले जाते. कारण शेतकऱ्याला सुगीचे दिवस आलेले असतात आणि व्यापारीवर्गाला लक्ष्मीच्या पाऊलखुणा दिसू लागलेल्या असतात. शहरी नोकरदारांच्या खिशात बोनसच्या रूपाने थोडाफार आधार वाटू लागलेला असतो. एकंदर वातावरण सकारात्मक असते. या सकारात्मकतेचा उत्सव म्हणजे दीपावली! मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळी। तै योगिया पाहे दिवाळी। निरंतर।। श्रीज्ञानेश्वर माऊलीने 'भावार्थदीपिके'च्या माध्यमातून शब्दफुलांची दिवाळी अशी साजरी केली. विश्वातील अविवेकाची काजळी झटकून टाकण्याचा ज्ञानेश्वर माऊलीचा इरादा आजही वंदनीय आणि तितकाच महत्त्वाचा आहे. 'आओ फिरसे दिया जलाएं, बुझी हुई बाती सुलगाये' असे आदरणीय स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या एका कवितेत म्हटले होते. त्यांनादेखील ज्ञानेश्वर माऊलींसारखेच काहीसे म्हणायचे होते. दिवाळीचा सण हा मनोमिलनाचा असतो. लोक एकमेकांकडे जातात, त्यांना शुभेच्छा देतात. जगण्याच्या धकाधकीत वर्षभरात मनामध्ये बरेच मळभ साचलेले असते. दिवाळीच्या निमित्ताने ते दूर होते. मनातील वेडेवाकडे विचार, मालिन्य, अग्निबाणाच्या फटाक्याप्रमाणे दूरवर आभाळात भिरकावून द्या असाच संदेश दीपावली आपल्याला देत असते. मनावरील ताणतणावांची जळमटे या दिवसांत दूर होतात. हिंदी भाषेत दिव्याला 'दिया' असे म्हणतात तसेच 'दिले' या अर्थाचे क्रियापद म्हणूनदेखील हाच शब्द वापरला जातो. आपल्याकडील शुभेच्छांची ओंजळ दुसऱ्याला देण्याची संधी दिवाळीच्या सणातच मिळते.**

# कोकणातील पारंपरिक भात मळणी

ठीक दिवाळी सणानंतर कोकणातील शेतकरी भात कापणीत मश्गुल होतो. अशावेळी कडक उन्हाचे चटके सोसत मेहनतीचे फळ लवकरात लवकर आपल्या घरी नेण्यासाठी म्हणून कृषक आतुर असतो. भातशेती कापून झाली की मग चोंड्यातील भाऱ्यांची मोळ (वरंडी) तयार करून चोंड्याच्या किनारील बांधावर उचलून ठेवल्या जातात, कारण अजून जमीन पाणथळ असल्याने शेतातीतील ओलसरपणा बराच राहिलेला असतो. विशेष म्हणजे भारे बांधावणीकरिता शेतालगतच असलेल्या भेंडीच्या झाडावरील निसर्ग वेली तोडून त्याचे बंध केले जातात. त्या वेली सुंभाचे काम करतात. सगळं कसं निसर्ग ठरवतो. काहींमध्ये चार, तर पुरुषी सहा अशा मोळी दाबल्या जातात, ज्यास भारा असे संबोधले जाते. घरामागील परसावातील खळे गोशेणाने व्यवस्थित सारवले जाते, ज्यांस शेणकुळा देणं असंही म्हणतात. त्या खळ्यात एका लाकडी मांडावणीवर शेतातून डोईवर वाहून आणलेले भातभारे नीट एकमेकांवर लादून ठेवले जातात. याला म्हणतात दाणा खळ्यात आला! कृषक त्या उडवीकडे भावनिक होऊन बघतो. मनोमनी देवाचे आभार मानतो!



खळ्यात सत्तर-पंचाहत्तर भाऱ्यांची भली मोठी उडवी सजवली जाते. दिवाळीनंतरचा हा सारा खटाटोप सोसून झाला की मग वरून उडवी पेंढ्यानी किंवा गवताने व्यवस्थित शिवली जाते. कोकणात पूर्वी गौतारु घरे अशीच शिवली जायची. अगदी तशीच उडवीसुद्धा शिवली जाते, कारण बेमोसमी पाऊसाचा भरोसा नाही. केव्हा बरसेल सांगता येत नाही. आलाच तर उडवीतला दाणा नासू नये म्हणून घेतलेली ही खबरदारी होय. शिवाय वातावरणातील दव जास्त पडू लागले की मग उडवीवर पत्रे ठेवले जातात. शिवाय उडवीच्या मांडावणी खालील मोकळ्या जागेतून उंदीर, घूस, व इतर कीटक दाण्याचा नाश करू नये म्हणून असे अनेक उपाय योजले जातात. त्या वेळी एका बुजुर्ग कृषकाने सुचवलेला उपाय जास्त योग्य वाटला. तो म्हणजे रोडन्टस (उंदीर, घुस व इतर कीटक)पासून धान्याचा बचाव करायचा असल्यास चुलीतील राख, ज्यामध्ये कापूर गोळ्यांचा बुका(पाउडर) असे मिश्रण उडवी खाली पेरून ठेवावे! शिवाय कडू लिंबाची पाने पसरवून ठेवावीत. यामुळे दाणा व्यवस्थित राखला जातो. उंदीर, घुस आक्रमक होत नाही. अशी जुनी जाणकार माणसं होऊन गेली. पुस्तकातून शेती केली जाते हे जरी खरे असले तरी प्रत्यक्ष शेतात राबलेल्या कृषकाचा अनुभव लाख मोलाचा असायचा. कमीत कमी सुविधा आणि भरपूर अंगमेहनत. शिवाय नांगरास जोडलेले बैल. भात लावणी पूर्ण होताच बैलांचे आभार मानले जातात, म्हणजेच श्रीफळ वाढवून त्याच्या पाया पडून त्यांना मोकळे सोडण्यात येते. जोखड ओढून-ओढून मानेवर झालेल्या जखमांना कडू तेल लावून बऱ्या केल्या जात असत. त्यांनी सोसलेल्या यातनांविषयी कृषक मनातून उपकृत राहतो. बैलांचे मनोमनी आभार मानतो. त्यास रोज रुचकर पेंडीचा खडा खायला देतो.

शेतकरी मनोमनी देवाचेही आभार मानून समाधान व्यक्त करतो, पण प्रत्यक्षात दाणा जरी दारात आला असला तरी अजूनही घरात आलेला नाही. म्हणूनच तो आतून काळजीत असतो. मळणीसाठी म्हणून निपुण मजूरांचा शोध सुरू होतो. मळणी हे एकदोन माणसांचे काम नव्हे. त्यांची पूर्ण टीम असते. चार गडी, तीन बायका असा ताफा असतो.

जमल्यास दिवसा किंवा लोडशेडिंग नसल्यास रात्री मळणी केली जाते. पौर्णिमेला जास्त करून मळणी हा प्रकार उरकला जातो. सोबतीला केरोसीनवर चालणारी गेसबत्ती (पेट्रोमॅक्स) वापरली जात असे. थंडीत जर का मळणी उरकायची असेल तर बहुतांश शेतकरी दिवसा त्याचे प्रयोजन करतात. दिवस ऊबदार मिळतो व अतिश्रमाची विशेष जाणीव होत नाही. मळणी हा कृषकाच्या जीवनातील एक उत्सव आहे, जो तो दरवर्षी साजरा करत असतो.

भात झोडल्यानंतर जो पेंढा उरतो त्याच्या मूळ भाऱ्यांपेक्षा कमी आकाराच्या मोळी तयार केल्या जातात. दाणा गळून पडल्यावर जो पेंढा उरतो तो गोठ्यातील गाई-म्हशींना पशू खाद्य म्हणून खायला दिला जातो. जो पुढील मान्सून येईपर्यंत पुरविला जातो.

याच पेंढ्याच्या मोळींनी पूर्वी घरांवर शाकार घातली जात असे. ते दिवस आता नाही राहिले. कोकण स्थिरावत आहे. सुख सुविधांची जोड आहेच!

समोर पडलेला दाण्याचा ढीग बघून कृषकांच्या चेहऱ्यावर समाधान उठून दिसते. दोन मजूर हाती सूप घेऊन ढिगातला केर त्याच्या वाऱ्याने कचरा दूर सारण्याचा प्रयत्न करतात. देवाच्या स्मरणार्थ ठेवलेला नारळ भक्तीभावाने वाढला जातो. उपस्थित स्त्री-पुरुष सर्व मजूर आवडीने खोबरं ग्रहण करतात. नंतर लगेचच रिकाम्या सुतळी गोणींमधून दाणा भरला जातो. आजही कोकणात पायली हे मोजमाप प्रचलित आहे. १६ पायली भात म्हणजे एक मण. असे २० मण गोणी भरून झाल्यास एक खंडी दाणा घरात आला असे जुने मोजमाप असायचे.

सुमारे दोन खंडी भात सामाऊ शकेल असे कोकणात पूर्वी लाकडी हडपे तयार केले जात असत. ज्यांची कुणाची भात शेती असायची (संसारी कौटुंबिक भातशेती) त्यांच्या घरी अन्न धान्य साठवण्यासाठी म्हणून असे मोठाले हडपे असायचेच.

मळणीचा हा प्रयोग वर्षातून एकदाच येतो. जणू तो दिवस सणाचा समजला जात असे. आनंदी वातावरणात ग्रामीण बोली भाषेत छान-छान गाणी गायली जात असत. स्त्रियादेखील पुरुषांना गाण्याची सुश्राव्य कोरसने साथ देत असत. लोकगीते अशीच निर्माण झाली असावीत. त्याची कोकणास लाभलेली एक विशेष परंपरा आहे. लोक हशी, अनुभवी, उत्सुकतेने भारलेले असायचे. बैलगाडी आणि लाल परी या व्यतिरिक्त दळणवळण सुविधा नसायच्या.

आणि हो, आणखी एक अलिखित नियम होता तो म्हणजे ज्या पटांगणात मळणी केली जाणार असेल त्या जागी वहाणा दिसता कामा नये. जो हा नियम मोडील त्यांस आर्थिक दंड भरावा लागत असे.

मळणी हा प्रकार आताही कोकणात जे 'संसार' करतात (म्हणजेच पूर्णवेळ शेतीत राबतात) त्यांच्याकडे नेहमी होताना दिसतो, पण त्यातील पूर्वीचा तो ग्रामीण टच, तो उत्साह मात्र काहीसा कमी झाल्याचे जाणवते. इव्हेंट नामक जो काही आज तरुणाईत जोम दिसतो तसा मळणी करताना कृषकाच्या घरी साजरा केला जात असे. सर्वत्र आनंदी वातावरण असते. खूप कष्टाचे, मेहनतीचे काम कुटुंबियांसमवेत आनंदाने साजरे करण्याचे दिवस आज आठवतात. कोकणातील भातशेतीला विशेष वाव राहिला नाही. खर्च जास्त आणि उत्पन्न कमी. शिवाय दाण्याला विशेष बाजार भाव नाही. ही आणि इतर अनेक कारणे असतील, पण आहे जी वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मळणी मात्र आजही कोकणात दिसून येते, तो खरा आनंद, उत्साह! जो एकदातरी अनुभवला गेला पाहिजे. पूर्वी तरुण काष्टीची धोत्रे नेसून हे अतिश्रमाचे काम करत असत. आज त्याजागी बर्म्युडा पँटी दिसतात. काळ वेळ बदलत राहतो. आपणही प्रवाहात सहभागी झालो तर आनंद द्विगुणित होईल!

**-इक्बाल शर्फ मुकादम,**
**दापोली, रत्नागिरी**



## बदलते तंत्रज्ञान


### कायरा.. भारतातली पहिली 'व्हर्चुअल इन्फ्ल्यूएन्सर'



इन्स्टाग्रामवर तुम्ही कायराला फॉलो करता का? ती मुंबईची असून, स्वतःचे वर्णन 'स्वप्नांचा पाठलाग करणारी, मॉडेल आणि प्रवासी' असे करते. तिचे २.५ लाख फॉलोअर्स आहेत. देशातील पहिली आभासी इन्फ्लुएन्सर असल्याचा दावाही ती करते. समाजमाध्यमांच्या जगात तिच्यासारखे बरेच जण आहेत. ही व्हर्चुअल व्यक्तिमत्त्वे त्यांचे अनुभव आपल्याशी शेअर करतात, संवाद साधतात आणि वस्तू खरेदी करायला सांगतात. एफ यू टी आर स्टुडिओज तर्फे हिमांशू गोयल यांनी या 'कायरा'ची निर्मिती केली आहे. अमेरिकन टुरिस्टर, बडवाइजर आणि एमजी मोटर्स यांच्यासह अनेक ब्रॅन्डबरोबर कायराची व्यावसायिक भागीदारी आहे.

व्हर्चुअल इन्फ्लुएन्सर म्हणजे काय? कोण असतात हे व्हर्चुअल इन्फ्लुएन्सर? - ती अर्थातच खरीखुरी माणसे नसतात. निमेटेड बार्बीप्रमाणे मनुष्यसदृश कुणी किंवा संगणकाने बनवलेल्या माणसांप्रमाणे दिसणाऱ्या आकृत्या असतात (सीजीआय - कम्प्युटर जनरेटेड इमेजरी). जगभर प्रसिद्ध पावलेले सीजीआय श्रेणीतील प्रतिमा-व्यक्तिमत्त्व म्हणजे लील मिकेला. २०१६ साली ती लॉस एंजेल्समध्ये जन्माला आली. नायके, कॅल्विन क्लेन आणि सॅमसंगसारख्या ब्रांडशी भागीदारी करून तिने २.८ दशलक्ष फॉलोअर्स मिळवले. कोरियन ओ रोझी ऑगस्ट २०२० मध्ये विकसित करण्यात आली. तिने १०० पेक्षा जास्त प्रायोजकत्वाचे करार मिळाल्याची माहिती मिळते. तिला आता भावंडेही होऊ घातली आहेत. या सगळ्या संगणकाने निर्माण केलेल्या प्रतिमा आहेत. त्या प्रतिमा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बळावर माणसाप्रमाणे वागता-बोलताना, गाता-नाचताना दिसतात. त्यांची व्यक्तिमत्त्वे लक्ष्य गटाला आकर्षित करू शकतील अशा पद्धतीने 'तयार' केली जातात. हे डिजिटल अवतार पूर्णतः काल्पनिक असतात. ते त्यांच्या प्रेक्षकांशी समाजमाध्यमातील पोस्ट, व्हिडीओ कॉमेन्टस आणि व्हर्चुअली अवतीर्ण होऊन संवाद साधतात.

# समाजसुधारक राजारामशास्त्री भागवत



## निमित्त

राजारामशास्त्री भागवत हे प्रख्यात विद्वान आणि समाजसुधारक होते. भाषाशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र व्युत्पत्ती, इतिहाससंशोधन, धर्मसुधारणा, वेद-पुराणे, स्मृती वगैरेंची चिकित्सा इ. ज्ञानाच्या क्षेत्रांमधील मोठे प्रज्ञावंत होते.

राजारामशास्त्री यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८५१ रोजी कशेळी (ता. राजापूर जि. रत्नागिरी) येथील भिक्षुकी करणार्या कर्हाडे ब्राह्मण कुटुंबात झाला. १८३०च्या सुमारास इंग्रजी शिक्षणार्थ त्यांचे वडील रामकृष्ण हरी व चुलते भास्कर हरी हे दोघे मुंबईस आले. पुढे रामकृष्ण हरी यांनी मुंबई नगरपालिकेत नोकरी केली. राजारामशास्त्री यांची आई ते लहान असतानाच वारली. वडील वेदान्त विषयाचे भोक्ते होते. सर्वसामान्यांना वेदान्त समजावा म्हणून रामकृष्णपंतांनी सायुज्यसदन (१८६८) आणि कायाजीचा संवाद अशी नाटके लिहिली होती. राजारामशास्त्री १८६७ साली मॅट्रिक झाले.

वडिलांच्या इच्छेनुसार त्यांचे ग्रँट मेडिकल कॉलेजात तीन वर्षे शिक्षण झाले. नंतर वडिलांच्या मृत्यूमुळे हे शिक्षण थांबले. एका संस्कृत पंडिताकडे अध्ययन करुन ते शास्त्री झाले. नंतर रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये १८७५ साली ते शिक्षक झाले. नंतर ते सेंट झेव्हिअर कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून शेवटपर्यंत होते. १९०२ साली मुंबई विद्यापीठात 'विल्सनफायलॉलॉजिकल'लेक्चरर म्हणून त्यांची निवड झाली. शिक्षणविषयक स्वतंत्र ध्येये असल्यामुळे त्यांनी १८८४ साली बॉंबे हायस्कूल व पुढे स्वालंबनाने मराठा हायस्कूल काढले. महर्षी कर्वे, रँ. परांजपे, बॅ, जयकर वगैरे अनेक नामवंत त्यांचे विद्यार्थी होते. भागवत लोकशिक्षक होते. पाश्चात्त्य व पौर्वात्य विविध भाषांचा सखोल अभ्यास शक्य व्हावा म्हणून विविध भाषा ते शिकले. लॅटिन, ग्रीक, अरबी, फार्सी, संस्कृत या भाषांतर प्रभुत्व असणाऱ्या राजारामशास्त्रींनी धर्मशास्त्र, व्युत्पत्तीशास्त्र, समाजशास्त्र, धर्मसुधारणा तसेच वेद-पुराणांची चिकित्सा केली. प्रार्थना समाजाच्या 'सुबोधपत्रिका' या साप्ताहिकात जातिभेद, अनिष्ट सामाजिक रूढी, स्त्रियांची सुधारणा यांवर लेखन केले. 'हिंदुधर्मविवेक'चे ते संपादक होते.

मुंबईमधील सर्वदेशीय वातावरणाचाही त्यांच्यावर परिणाम झाला. विधवाविवाह वगैरे प्रश्नांवर सुरुवातीस त्यांची मते जुनी होती. नंतर मात्र ती पालटली. अस्पृश्यता निवारणाकडेही त्यांनी सक्रिय लक्ष दिले. हिंदू धर्माची शास्त्रबोवांनी जी निस्पृह व निर्भीड समीक्षा केली होती तिच्यासंबंधी डॉ. आंबेडकरांनीही त्यांची प्रशंसा केलेली आहे. १९००नंतर प्रथम बडोदे व पुढे कोल्हापूर येथे वेदोक्त प्रकरण गाजले. मराठे क्षत्रिय आहेत असे शास्त्राधारयुक्त मत व्यक्त करून राजारामशास्त्री यांनी शाहू महाराजांचा पक्ष घेतला. मराठा मुलांची उपनयने चालू व्हावीत म्हणून कोल्हापूर-बेळगाव येथे जाऊन स्वतः त्यांनी पौरोहित्य केले. त्यांना गायत्री मंत्र दिला.

दीनबंधू या सत्यशोधक मुखपत्रात जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी अनेक वादळी लेख लिहिले. लोकहितवादींच्या धारदार शतपत्रांत त्यांनी भरच घातली. जोतीराव फुले व राजारामशास्त्री यांच्या काही प्रतिपादनात व कृतींत साम्य आढळते. स्त्रियांची सुधारणा व सुशिक्षण यासंबंधानेही शास्त्रीबोवांनी प्रयत्न केले. राजारामशास्त्री यांच्या पत्नी सुंदरबाई प्रेमळ व कष्टाळू होत्या. त्यांना एकुलती एक मुलगी होती ती १८९७ साली वारली. चुलत भावाला राजारामशास्त्र्यांनी पुत्रासमान मानले होते. तोही १९०७ साली वारला. संस्कृतचे विद्वान असूनही त्यांना मराठी बोलभाषेचा विलक्षण अभिमान होता. वादळी विचारसरणी असलेल्या राजारामशास्त्रींना विरोध झाला. तरीही न डगमगता कार्य सुरू ठेवले. मुंबई येथे ४ जानेवारी १९०८ रोजी राजारामशास्त्रींचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**श्रीवर्धन : सुंदर दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर सूर्यास्ताच्या वेळी समुद्रात पोहण्याची मजा घेताना पर्यटक.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

### वाढत्या वयात मुलांना द्या 'हे' पदार्थ; अनेक फायदे

सर्वसाधारणपणे १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुले ही किशोरवयीन असतात. आणि याच काळात त्यांच्यात फक्त शारीरिक नव्हे तर मानसिकी आणि भावनिक बदलही होत असतात. त्यामुळे या काळात मुलांच्या मानसिक आरोग्याची आणि शारीरिक वाढीची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. सध्याच्या खराब आणि ढासळत्या जीवनशैलीत पालकांना अनेकदा त्यांच्या मुलांच्या विकासाबद्दल चिंता वाटत असते. किशोरवयीन मुलांमध्ये खाण्याच्या सवयीपासून ते व्यायामापर्यंत आरोग्यदायी सवयी लावणे खूप महत्त्वाचे आहे.




देशी तूप, दूध, दही आणि लोणी यासारख्या दुग्धजन्य पदार्थांचा मुलांच्या आहारात समावेश करणे आवश्यक आहे. किशोरवय हा शारीरिक वाढीचा काळ असतो. आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी आढळतात ज्यामुळे दात आणि हाडे मजबूत होतात. त्यामुळे मुलांची उंचीही वाढण्यास मदत होते.

**प्रोटीनयुक्त पदार्थही गरजेचे**

पौगंडावस्थेत स्नायूंना बळकट करण्यासाठी की अंडी, बीन्स, टोफू, चिकन, सोयाबीन, कडधान्ये, सुका मेवा इत्यादी प्रथिनयुक्त पदार्थांचा मुलांच्या आहारात समावेश करावा. यामुळे मेटाबॉलिज्मटा रेट वाढतो. तसेच प्रथिनेयुक्त आहारामुळे मेंदूचा विकास होण्यास मदत होते. यामुळे शारीरिक व मानसिक बदल होत असताना मूल शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या मजबूत राहू शकते.

**व्हिटॅमिन आणि मिनरलयुक्त पदार्थ**

किशोरवयीन मुलांनी संतुलित आहार घेणे खूप महत्वाचे आहे. जीवनसत्त्वे असलेल्या पदार्थांच्या सेवनामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. आणि वाढत्या वयात मुलांचे रोगांपासून संरक्षण होते, ज्यामुळे त्यांची वाढ चांगली राहते. या वयात मायक्रो कंपाऊंड झिंक व्यतिरिक्त शरीराला मॅग्नेशिअम, आयोडीन, लोह आणि कॅल्शिअमचीही गरज असते. हे सर्व पोषक घटक आहारातून मिळू शकतात. यासाठी आहारात भरपूर फळे, बिया आणि हिरव्या भाज्यांचा समावेश करा.

**कार्बोहायड्रेट्समुळे मिळते एनर्जी**

वाढत्या वयातील मुलांच्या आहारात कार्बोहायड्रेट्सयुक्त पदार्थांचा भरपूर समावेश करावा. यासाठी आहारात बाजरी, ज्वारी, नाचणी यासारख्या संपूर्ण धान्याचा समावेश करावा. तसेच बटाटा, रताळं यासारख्या स्टार्चयुक्त पदार्थांचाही आहारात समावेश असावा.

# पाणीटंचाईवर महिनाभरात उपाययोजना करणार

## पाली येथील आमसभेत आमदार रविशेठ पाटील यांचे आश्वासन

### कामचुकार अधिकाऱ्यांची काढली खरडपट्टी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाली पंचायत समितीच्या कै. नामदेवशेठ खैरे सभागृहात आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. ९) आमसभा झाली. आमसभेच्या प्रारंभी विविध अभिनंदन ठराव आणि दुखवटा ठराव घेण्यात आला.

सभेत पिण्याच्या पाण्याचा मुद्दा चांगलाच गाजला. मागील अनेक वर्षांपासून पालीतील शुद्ध पाणीपुरवठा नळयोजनेचे काम लालफितीत अडकले आहे. पाणीप्रश्नावर कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांनी आमसभेत संताप व्यक्त केला. नगरपंचायतीमधील कोणताही जबाबदार अधिकारी, इंजिनिअर याठिकाणी उपस्थित नसल्याने आमदार रविशेठ पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबतचा ठराव करून रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे तसा प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशा सूचना दिल्या, तर पालीच्या पाणी प्रश्नावर माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी, सद्यस्थितीत येथील नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय जलदतेने दूर करण्यासाठी तत्परतेने उपाययोजना करण्यावर भर दिला जाईल, असे



आश्वासन दिले.

शेतकरी बांधवांनी कृषी विभागाच्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त केली. आमदार रविशेठ पाटील यांनी कृषी अधिकाऱ्यांना खडसावले. तालुक्यात कृषी विभागाकडून लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविल्या जात नाहीत, कृषी बंधारे योजना राबवित नाहीत, ठेकेदारांना का पोसता? अशा शब्दात त्यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी केली. अनेक ठिकाणी अंगणवाडी इमारत नसल्याने नवीन इमारतीकरिता प्रस्ताव देण्याचे ठरविण्यात आले. आमदार रविशेठ पाटील यांनी, बसस्थानक इमारत हे काम बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा (बीओटी) या तत्वावर असल्याने या प्रश्नी पाठपुरावा करून काम मार्गी लावण्याबाबत सूचना दिल्या.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी त्यांच्या विभाग अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, वैयक्तिक लाभ योजनांची सविस्तर माहिती दिली. या वेळी तहसीलदार उत्तम कुंभार, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, पाली पं. स. गटविकास अधिकारी लता मोहिते, पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, भाजप नेत्या गिता पालरेचा, सुधागड भाजप अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, भाजप माजी सुधागड तालुकाध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, आरिफ मणियार आदींसह प्रशासकीय अधिकारी, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# रायगड जि. प.च्या नवीन इमारतीसाठी प्रस्ताव सादर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची शिवतीर्थ इमारत पाडून नवीन इमारतीचे बांधकाम केले जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. नवीन इमातरीच्या बांधकामासाठी ८७ कोटी रुपयांचा निधी लागणार आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली.

रायगड जिल्हा परिषदेची शिवतीर्थ इमारत मोडकळीस आल्याने ती तातडीने खाली करण्याचे निर्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी दिले होते. यानुसार जून महिन्यात संपूर्ण इमारत खाली करण्यात आली होती. आता ही इमारत पाडून त्याठिकाणी पाच मजली नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. तळमजला आणि पहिला



मजल्यावर वाहनतळ असणार आहे, तर उर्वरित मजल्यांवर विविध विभागांची कार्यालय असणार आहेत. जुन्या इमारतीचे पाडकाम, नवीन इमारतीचे बांधकाम आणि त्यातील फर्नीचर असे तीन टप्प्यात हे काम केले जाणार आहे. यासाठी एकूण ८७ कोटी रूपयांचा निधी लागणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेनंतर या संदर्भातील प्रस्ताव राज्याच्या ग्रामविकास विभागाकडे सादर करण्यात आला असल्याची माहिती डॉ. बास्टेवाड यांनी दिली. शासनाच्या मंजुरी आणि निधी उपलब्ध झाल्यावर हे काम सुरू करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीचे बांधकाम १८८२ साली करण्यात आले होते. गेली पाच दशके याच इमारतीतून जिल्हा परिषदेचा कारभार सुरू होता, मात्र गेल्या काही वर्षापासून ही इमारत धोकादायक अवस्थेत आली होती. त्यामुळे दोन वेळा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते. या इमारतीच्या चौथ्या व तिसऱ्या मजल्यावरील कार्यालये रिकामी करण्यात आली. नंतर इमारतीमधील सर्वच कार्यालये इतर ठिकाणी हलवून ही इमारत पूर्ण रिकामी करण्यात आली होती. ही सर्व कार्यालये सध्या पंचायत समिती, जिल्हा रुग्णालय आणि कुंटेबाग परिसरात स्थलांतरीत करण्यात आली आहेत.

# निजामपुरात उद्या ‘दिवाळी पहाट’

**माणगाव : वार्ताहर**

तालुक्यातील निजामपूर विभाग सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व बाबुशेठ खानविलकर मित्रमंडळ यांच्या वतीने निजमापुर येथे जुनी बाजारपेठ या ठिकाणी रविवारी (दि.१२) सकाळी ५:३० वाजता दिवाळी पहाट व सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी वाजविणाऱ्या मान्यवरांचा विशेष गुणगौरव व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

दिवाळी पहाट कार्यक्रमात मंदार महामुणकर निर्मित सुनीला इव्हेंट्स प्रस्तुत स्वरस्पर्श एक स्वरमयी दिवाळी पहाट हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गतिमंद विद्यार्थ्यांनी तयार केल्या विविध कलाकृती

## शिक्षक, पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग



**खोपोली : प्रतिनिधी**

येथील शालोम एज्युकेशन सेंटर संचलित सोफिया गतिमंद मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवलेले आकर्षक आणि रंगीबेरंगी पणत्या व कंदील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

ऑगस्ट २००५पासून खालापूर तालुक्यामध्ये यशस्वीपणे कार्यरत असणारी एकमेव शाळा आहे. शाळेच्या उपाध्यक्षा रूपा मजेठिया यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली येथे गतिमंद मुलांची शाळा सुरू आहे. यामध्ये ३० विद्यार्थी शिक्षण व प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत.

शाळेच्या मुख्याध्यापिका शुभा पाटणकर यांनी स्वतः मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना मागील वर्षीप्रमाणे मुलांना प्रोत्साहन देऊन विविध वस्तू तसेच अन्य वस्तूंची निर्मिती करण्यात आली तसेच शाळेतील शिक्षक साक्षी पवार, मंजू बोडके, कर्मचारी दुर्गा दबडे, रुचिता सावंत, जयकुमार म्हात्रे या सर्वांच्या मदतीने या उपक्रमाला चांगलाच प्रतिसाद मिळाला.

या शाळेतील मुले वर्षभर दिवाळीचे व अन्य साहित्य बनवत असतात पेपर डिश, अगरबत्ती, फाइल्स, प्रेझेंट पाकीट, छोट्या-मोठ्या आकाशकंदील, राखी, लिफाफे, उटणे, फुले, न्यूजपेपर बॅग, मेणबत्ती, पणत्या, बुके, अशा अनेक वस्तू दिवाळी मेळावा लोहाना हॉल, व याक स्कूल येथे प्रदर्शनात ठेवण्यात आल्या होत्या. हा मेळावा पुढील आठ दिवस असल्याने, विविध वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांनी आवर्जून स्टॉलला भेट द्यावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी या वेळी केले.

# नागरिकांनी दिवाळी काळात सतर्क राहावे

## माणगाव पोलीस ठाण्यातर्फे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

दिवाळीनिमित बाहेरगावी किंवा पर्यटनस्थळी फिरायला जाताना, नागरिकांनी सतर्क राहून सावधानता बाळगणे आवश्यक आहे. मौल्यवान दागिने परिधान करू नका. अनेक घरे दिवस बंद असतात. अशा वेळी चोरट्यांच्या टोळ्या दिवसा बंद घरांची पाहणी करून रात्री किंवा दिवसा चोरी करतात. यासाठी नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक असल्याचे माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी सांगितले.

नागरिकांनी बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना व स्थानिक पोलिसांना अवगत करावे जेणेकरुन त्या परिसरातील बंद घरावर गस्तीदरम्यान पोलिसांना लक्ष ठेवता येईल. बाहेरगावी जाताना घरात मौल्यवान दागिने, किमती ऐवज, रोख पैसे घरात ठेवण्याऐवजी बँकेतील लॉकरमध्ये ठेवावेत. बाहेरगावी जाताना प्रवासादरम्यान देखील काही अनोळखी व्यक्ती प्रवाशांना बोलण्यात गुंतवून सामानाची किंवा इतर मौल्यवान दागिन्यांची चोरी करतात. प्रवास करताना काही महिला दागिने परिधान करतात. अशा वेळी सोनसाखळी चोरीच्या घटना घडतात. त्यामुळे प्रवास करताना महिलांनी शक्य असल्यास मौल्यवान दागिने परिधान करण्याचे टाळावे, असे आवाहन माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी केले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
दरपत्रक

जा.क्र.पमपा/बांधकाम/६७२३/प्र.क्र. ३३/४०४९/२०२३ दिनांक: १०/११/२०२३

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल मधील बल्लाळेश्वर मंदिर व रामेश्वर मंदिर येथे प्रवेशद्वार बांधणे व घाटाचे उन्नतीकरण करणे. | ११/११/२०२३ ते १७/११/२०२३ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.११/११/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वत:च्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmbandhkamdept01@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
अतिरिक्त आयुक्त-।
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, मौजे-जासई व पौंडखार, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादीत केलेल्या आहेत.

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजे-जासई व पौंडखार, ता. उरण, जि. रायगड.**

| यु. केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| जासई-८४ | १६ | ७ | ०-२१-०० | २.१२ |
| पौंडखार-५२ | १२ | ० | ०-२८-१० | २.५० |

वर नमुद संपादीत मिळकतीपोटी सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे **कै. बायमाबाई नामदेव पाटील मयतचे वारस श्री. काशिनाथ नामदेव पाटील यांना मौजे- द्रोणागिरी/ जे.एन.पी.टी., ता. उरण, जि. रायगड** येथे अंदाजे **५५० चौ.मी.** क्षेत्राचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे. आमचे अशिल सदर भूखंड **श्री. काशिनाथ नामदेव पाटील** यांच्याकडून मोबदल्यापोटी त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत.

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : १०/११/२०२३.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ.**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मोबाईल क्र. : ९९३०३६९८६१


# माथेरान पालिकेकडून फटाक्यांवर निर्बंध

## पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या पर्यटनस्थळ माथेरानमध्ये नगरपालिकेकडून फटाक्यांवर निर्बंध आणले आहेत. १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाच्या फटक्या विक्रीसाठी ठेवताना आढळ्यास त्या दुकानदारांवर कारवाई करण्यात येणार आहे.

माथेरान शहर हे उंच शिखरावर वसले असून उंच घनदाट वृक्षराजी आहे. दिवाळीमध्ये पर्यटकांसह नागरिकही फाटक्या आनंदाच्या आवेशात फोडतात. याबाबत सरकारच्या अधिसूचनेनुसार फाटाक्यांची विक्री आणि वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. याचे पालन माथेरान नगरपालिकेकडून करण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार फटाक्यांवर निर्बंध लादले गेले आहेत. मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी या पर्यावरणीय शहरात पर्यावरणपूरक दीपावली साजरी करून यापुढेही नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.



### दुकानदारांकडून आवाहनाचा आदर

माथेरानमध्ये दुकानदारांनी फटाक्या न ठेवता पर्यावरण दिवाळी साजरी करावी असे आवाहन केले असून त्या आवाहनाला प्रतिसाद देत येथील दुकानदारांनी फटाक्यांची दुकाने लावली नाहीत. पर्यटकांच्या साक्षीने पर्यटनाच्या माध्यमातून दीपावली साजरी करण्याचे दुकानदारांनी ठरवले आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, मौजे-शेवा, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादीत केलेल्या आहेत.

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजे-शेवा, ता. उरण, जि. रायगड.**

| यु.केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| २७८ | २१ | १७ | ०-०२-०० | ०.२२ |
| | २२ | ७ | ०-०९-२० | १.४५ |
| | ३० | १० | ०-०७-२० | ०.७९ |
| | ५९ | १९ बी | ०-१३-०० | ०.३३ |
| २७८/। | २ | २० | ०-२२-०० | ०.६२ |
| २७८/।। | १८ | ९ | ०-१२-०० | ०.३४ |
| | १९ | २२ | ०-०९-४० | १.३७ |

वर नमुद संपादीत मिळकतीपोटी सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे **कै. मोरु उर्फ मोरेश्वर रामा म्हात्रे मयतचे वारस श्री. जनार्दन मोरु उर्फ मोरेश्वर म्हात्रे यांना मौजे- द्रोणागिरी/ जे.एन.पी.टी., ता. उरण, जि. रायगड** येथे अंदाजे ६५० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे. आमचे अशिल सदर भूखंड श्री. जनार्दन मोरु उर्फ मोरेश्वर म्हात्रे यांच्याकडून मोबदल्यापोटी त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत.

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : १०/११/२०२३.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ.**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मोबाईल क्र. : ९९३०३६९८६१



**उरण नगरपरिषद**
**जाहीर आवाहन**

जा.क्र.२०६५/२०२३-२४
दिनांक :- १०/११/२०२३

उरण शहरातील सर्व फटाके विक्री करणारे व्यवसायिक व फटाके वापर करणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.682 (E) Date 05/10/199 अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री, वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरीयम सॉफ्ट, लिथीयम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घट असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायु तयार होतात. हे वायु प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२/२०१५ मध्ये मा. ना. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्दे शानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्यास अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नयेत. तसेच फटाक्यांची विक्री नगरपंचायतीने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच करण्यात यावी.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ४.०० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियानांतर्गत फटाके मुक्त प्लास्टीक मुक्त, कचरा मुक्त, प्रदुषण मुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टीवल, सण-उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करू. सदर अभियानांतर्गत नागरीकाना फटाक्याचा वापर टाळावा. प्लास्टीकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. सण समारंभामध्ये टाकावू वस्तूंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करावा. पर्यावरण पूरक, प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

तरी येणारी दिवाळी हरीत व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करूया. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

सही/-
मुख्याधिकारी,
उरण नगरपरिषद, उरण, जिल्हा - रायगड



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E –TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1. | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000029069 Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-52/ 2023-2024.** RFx e-tender for work of removing of dry grass, bush and providing of tractor of Various 220kV&100kV lines under EHV Lines S/Dn. Panvel I&IIunderEHV(O&M)Division Panvel. **Tender amount Rs. 8,06,589/-, EMD amount Rs. 8,066/-** |
| | Online Downloading the RFx. | **10.11.2023, 18:00 Hrs. to 19.11.2023, 23:59 Hrs.** |
| | Online Submission of the Rfx | **On or Before 19.11.2023 up to 23:59 Hrs.** |
| | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **20.11.2023 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in Contact Person:-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. **022- 2746 5410. Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer,**
**EHV (O&M) DN, Panvel**

## निवडक

### शिधापत्रिकाधारकांना धान्यकिट वाटप



**नवी मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांना (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन)च्या वतीने धान्यकिट वितरण करण्याचे जाहीर केले. याच अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते आग्रोळी गावातील शिधावाटप केंद्रातून धान्यकिट वाटपाची सुरुवात करण्यात आली. या वेळी माजी नगरसेविका राजश्री कातकरी, सुभाष गायकवाड, सुधीर पाटील, निलेश पाटील, स्वरूप पाटील, विनोद म्हात्रे, रुपेश कांबोटकर, विनोद डोंगरे, संदीप पाटील, दिनेश डोंगरे, भूषण पाटील तसेच शिधावाटप निरीक्षक शीतल लाडके, निरीक्षक अमोल बराटे, शिधावाटप केंद्र चालक प्रमोद कंबोटकर तसेच असंख्य लाभार्थी उपस्थित होते.

### वेद म्हात्रे झळकला आकाशवाणीवर



**उरण :** समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या शाळाबाहेरची शाळा या कार्यक्रमात मंगळवारी (दि. ७) रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाले येथील इयत्ता दुसरी शिकणारा वेद राजेंद्र म्हात्रे याची निवड करण्यात आली होती. वेद व त्याच्या आईला दसरा या सणाबाबत माहिती विचारण्यात आली. या वेळी वेदने न घाबरता मुलाखत दिली. ही मुलाखत सामुहिकरित्या ऐकविण्यात आली. वेद म्हात्रे यास ही संधी उपलब्ध करून देण्यासाठी वर्गशिक्षिका चैताली म्हात्रे तसेच रणिता ठाकूर व तेजश्री कोळी यांनी विशेष मेहनत घेतली. त्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलाचा मात्रे यांनी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करून आभार मानले.

### कोकण विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई** : कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य प्रशासन) अजित साखरे यांनी कळविले आहे.

### उरण येथे मोफत वैद्यकीय शिबिर

**उरण** : येत्या ४ डिसेंबर रोजी नौदल दिनाचे औचित्य साधून नेव्ही स्टेशन करंजा आणि हॉस्पिटल संधनी यांच्या वतीने गुरुवारी (दि. १६) उरण एज्युकेशन सोसायटी बोरी पालक मैदान उरण येथे सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ आणि दंतचिकित्सक, शल्य चिकित्सक, त्वचारोगतज्ज्ञ, बालरोग, नेत्रचिकित्सा आदींची तपासणी करून मोफत औषधे दिली जातील व सल्ला दिला जाईल. प्रत्येकासाठी डोळे तपासणी करून चष्म्याचे मोफत वाटपदेखील केले जाईल. रक्त तपासणीची सुविधाही मोफत दिली जाणार आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खारघरमध्ये घरातून सोनसाखळी लंपास

**पनवेल** : राहत्या घरातील बेडरूममध्ये टेबलवर ठेवलेली ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलिस अधिक तपास करीत आहेत. राहुल कृष्णत यादव (वय २६) हे आकाशगंगा सोसायटी खारघर येथे राहतात. ते झोपताना चेन काढून बेडरूमच्या टेबलवर ठेवत असत. त्यांनी दुपारी चेन काढून ठेवली होती. सायंकाळी सातदरम्यान पाहिली असती सापडली नाही. त्यांनी आजूबाजूला घरात व मित्रांकडे चौकशी केली, मात्र चेन सापडून आली नाही. दरवाजातून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून सोन्याची चेन चोरून नेली अशी तक्रार त्यांनी दिली आहे.

# नवी मुंबईत वायू प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना

## डेब्रिजची वाहतूक बंद करण्याचे विकसकांच्या बैठकीत निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील हवेची गुणवत्ता चांगली रहावी ही सर्व नागरिकांची जबाबदारी असून प्रदूषण कमी करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका विविध उपाययोजना राबवित आहे. वायू प्रदूषणामध्ये बांधकामे करताना उडणारी धूळ हा एक महत्त्वाचा विषय असून या दृष्टीने बांधकामाशी संबधित घटकांना सतर्क करण्यासाठी महापालिका मुख्यालयात बांधकाम व्यावसायिक आणि वास्तूविशारद यांच्या विशेष बैठकीचे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते.



या वेळी आयुक्तांनी माजी उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महापालिकेने हवा गुणवत्तेबाबत तत्पर कार्यवाही करण्यास सुरुवात केली असल्याची माहिती दिली व यामध्ये बांधकामांमुळे होणाऱ्या प्रदूषणाला प्रतिबंध करण्यासाठी महापालिकेने त्वरित केलेल्या कार्यवाहीविषयी सांगितले.

महापालिका प्रशासन व बांधकाम व्यावसायिक आणि वास्तूविशारद यांनी एकत्र येऊन शहराचा विकास करताना शहराच्या हवा गुणवत्ता प्रमाणकाचीही काळजी घ्यावी, असे आयुक्तांनी सांगितले. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बांधकाम साईट्सवरून पुढील आदेश होईपर्यंत डेब्रिजची अजिबात वाहतूक होणार नाही, याचे काटेकोर पालन करावे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे साईट्सवर बांधकाम साहित्य आणणे अत्यंत गरजेचे असेल तेव्हा ते वाहन पूर्णत: झाकलेले असेल असेही स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. केवळ खासगी बांधकाम व्यावसायिकांना वायू प्रदूषण रोखण्याबाबत निर्देश देत नाही तर सोबत महापालिकेमार्फत सुरू असणाऱ्या विविध प्रकारच्या बांधकामांच्या ठिकाणीही वायू प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेत असल्याचे व तशा प्रकारचे निर्देश अभियांत्रिकी विभागाला दिले असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

वास्तूविशारद संतोष सतपथी यांनी बांधकामांमुळे होणारे वायू प्रदूषण व त्यावर नियंत्रण आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. बैठकीला शहर अभियंता संजय देसाई, सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकाण, अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड, बिल्डर्स असोसिएशन ऑफ नवी मुंबईचे अध्यक्ष वसंत बद्रा, असोसिएशन ऑफ आर्किटेक्टचे अध्यक्ष शेखर बागुल तसेच बांधकाम व्यावसायिक सर्वश्री हितेन जैन, केतन त्रिवेदी, अनिल पटेल व लखानी त्याचप्रमाणे वास्तूविशारद कौशल जाडिया आणि इतर बांधकाम व्यावसायिक व वास्तुविशारद मोठ्या संख्येने उपस्थित होत. बांधकामाच्या ठिकाणी धूळ निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे, त्यासाठी स्प्रिंकलर फवारणी करणे या बाबींची काटेकोर दक्षता घ्यावी व नवी मुंबईकरांची दिवाळी स्वच्छ, प्रदूषणमुक्त व सुरक्षित करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध होऊया असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी बांधकाम व्यावसायिक व वास्तूविशारद यांना केले.

## घरगुती पणत्यांचे प्रदर्शन, विक्री



**नवी मुंबई : बातमीदार**

मन की बातच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वोकल फॉर लोकलचा प्रचार करण्याचे आवाहन केले होते, तसेच सणांच्या काळात स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देण्यास सांगितले आहे. त्यानुसार नवी मुंबई भाजप उत्तर भारतीय मोर्चा आणि महिला उत्कर्ष सेवा समितीच्या वतीने तुर्भे येथील हनुमान नगर येथील महिलांनी बनवलेल्या मातीच्या दिव्यांच्या प्रदर्शन व विक्रीला सानपाडा येथे ठेवले आहे.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. प्रत्येकाने छोट्या व्यापाऱ्यांकडून दिवाळीची खरेदी करावी, स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे आणि दिवाळीतही आनंदाचा दिवा लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमादरम्यान माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश राय, भाजपा नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस नेत्रा शिर्के, भाजप नवी मुंबई महिला मोर्चा अध्यक्षा माधुरी सुतार यांच्यासह महिला उत्कर्ष सेवा समितीच्या सुषमा सिंह, उत्तर भारतीय मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल सिंह, सचिव बिंदू दुबे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भविष्यातील जलनियोजनासाठी तज्ज्ञांची मदत

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वत:च्या मालकीच्या मोरबे धरण प्रकल्पामुळे नवी मुंबई जलसंपन्न शहर म्हणून ओळखले जाते. ही ओळख कायम राखण्यासाठी शहराचा झपाट्याने होत असलेला विकास लक्षात घेत दूरदृष्टीचा विचार करीत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन जलनियोजन करण्यात येत आहे. यादृष्टीने नवीन जलस्त्रोत शोधण्याकरिता या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची विशेष समिती गठीत करण्यात आली असून या समितीची दुसरी बैठक आयुक्त दालनात झाली.



या बैठकीमध्ये जून २०२३मध्ये झालेल्या पहिल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्या बैठकीत तज्ज्ञ समिती सदस्यांनी केलेल्या सूचनांस अनुसरून संकलीत केलेल्या माहितीचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये नवी मुंबई महापालिकेची पाणीपुरवठा सद्यस्थिती जाणून घेण्यात आली व २०५०मधील नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या विचारात घेऊन आवश्यक पाणीपुरवठ्याविषयी विचार करण्यात आला.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विकास व त्यामुळे वाढणारी लोकसंख्या विचारात घेण्यात आली, त्यासोबतच भविष्यात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट होऊ घातलेल्या ठाणे जिल्ह्यातील १४ गावांचा होणार विकास व त्या भागातील आगामी लोकसंख्येसाठी आवश्यक असणारे पाणीसुद्धा विचारात घ्यावे अशी सूचना करण्यात आली.

भिरा येथील जलविद्युत प्रकल्पातून कुंडलिका नदीत सोडण्यात येणारे पाणी शहरांतील नागरिकांसाठी वापरात आणण्याकरिता सिडको, पनवेल, आणि नवी मुंबई महापालिका यांनी एकत्र येऊन शासनाकडे संयुक्तपणे प्रस्ताव सादर करणेबाबत या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला.

पाताळगंगा नदीमध्ये टाटा पॉवर यांचेमार्फत वीज निर्मिती केल्यानंतर सोडून देण्यात येणाऱ्या पाण्यामधून १०० द. ल. लि. पाणी खोपोली येथून भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रामध्ये आणण्याबाबत आवश्यक अशा पर्यायांचा अभ्यास करून त्याचा तांत्रिक अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पाताळगंगा नदीतील पाण्यासाठी इतर संस्थांनी केलेले आरक्षण वापरात नसल्यास महापालिकेमार्फत या पाण्याच्या आरक्षणाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेविषयी पर्यायही विचारात घेण्यात आला. याव्यतिरिक्त कुंडलिका नदीवरून पर्यायी शाश्वत स्त्रोताबाबत प्राथमिक अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## आमदार रमेश पाटील यांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त आजी-माजी सदस्यांसाठी बुधवारी (दि. ८) स्नेहमेळावा आणि परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधान परिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला ठसा उमटवला आहे. याच विधान परिषदेच्या शतक महोत्सवाचे औचित्य साधून विधान परिषदेच्या विद्यमान तसेच माजी सदस्यांसाठी स्नेहमेळावा आणि परिसंवादाचे आयोजन केले होते.



या वेळी सभागृहात उत्तम कामगिरी केल्याबद्दल भाजप आमदार रमेश पाटील यांचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह विधान परिषदेचे सदस्य उपस्थित आहेत.

## कल्याणच्या नूतन विद्यालयात दिवाळीनिमित्त चांद्रयानची महारांगोळी

**नवी मुंबई : बातमीदार**

संस्कृती आणि विज्ञान विषयावर चांद्रयान ३ची महा रांगोळी दीपावलीच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिक्षण संस्थेचे नूतन विद्यालयाच्या पटांगणात दीपोत्सव निमित्ताने ७० फूट बाय ४० फूट आकाराची चांद्रयान ३ महारांगोळी विद्यालयाचे कलाशिक्षक श्रीहरी पवळे आणि विद्यार्थी यांनी साकारली. या दीपोत्सवामध्ये पूर्व प्राथमिक प्राथमिक आणि नूतन विद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका साबळे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका भारती वेदपाठक आणि माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद या मुख्याध्यापकांनीही सहकार्य केले. कला शिक्षक श्रीहरी पवळे आणि विद्यार्थ्यांनी एकूण चार तासांत ही रांगोळी पूर्ण केली. यासाठी एकूण ४०० किलो रांगोळी वापरण्यात आली.



कल्याणमधील प्रतिष्ठित मान्यवरांनी पालकांनी आणि तिचे माजी अध्यक्ष अशोक प्रधान यांनीही या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

## केबीपी कॉलेजमध्ये मिलेट महोत्सव; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये बुधवारी (दि. ८) मिलेट (कडधान्य) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. केबीपी कॉलेज आणि अन्न व औषध प्रशासन विभाग ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन एफडीएचे सहाय्यक आयुक्त जी. व्ही. जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक होत्या.




सहाय्यक आयुक्त जगताप यांनी मिलेट महोत्सवाची उपयुक्तता आपल्या उद्घाटनपर भाषणातून व्यक्त केली. २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय मिलेट वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. आजची तरुण पिढी फास्टफूडच्या आहारी गेली आहे. त्यामुळे कडधान्याचे महत्त्व, त्याचे आरोग्याला असलेले फायदे आजच्या तरूण पिढीला पटवून देण्यासाठी अशाप्रकारच्या महोत्सवाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या विजया चक्रवती यांनी, आहारात कोणकोणत्या गोष्टीचा उपयोग केला पाहिजे याविषयी सविस्तर माहिती दिली. आहारतज्ज्ञ डॉ. शीतल नांगरे यांनी कमी तेल, कमी मीठ व कमी साखर आहारात ठेवावी असे मत व्यक्त केले. गजानन पाटील म्हणाले की, भारतात सर्वाधिक लोकसंख्या युवकांची आहे. त्यांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. आहारात कडधान्यांचा वापर केल्यास युवकांची प्रतिकारशक्ती वाढेल. भारतातील डायबेटीज, ब्लडप्रेशर, हायपरटेंन्शन यांसारखे आजार नियंत्रणात येतील, असे प्रतिपादन केले.

या महोत्सवाची सुरूवात प्रभातफेरी काढून करण्यात आली. या वेळी पोस्टरस्पर्धा व कुकींग स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनातून सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी फूडटेक विभागाच्या प्रमुख प्रा. दिपाली मोहिते, डॉ. केशव शिंदे, प्रा. मनमिंदर रियात, प्रा. कल्याणी पाटील यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. मोनी सिंग यांनी, तर आभार प्रा. स्नेहल कदम यांनी मानले.

## सराफाच्या दुकानातून मालासह रोख रकमेची चोरी

**पनवेल** : दुकानातील लोखंडी ग्रीलला लावलेले कुलूप तोडून टेबलचा ड्रॉवर तोडून त्यात ठेवलेली चांदीची वीट व रोख रक्कम असा ९२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याप्रकरणी आरोपी विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल येथे सुरेश जनार्दन मानकामे यांचे सोनाराचे दुकान मिरची गल्ली राममंदिरजवळ आहे. नेहमीप्रमाणे सकाळी आपले दुकान उघडण्यासाठी आले असता त्यांना दुकानातील सामान विखुरलेले दिसले. त्यात त्यांनी अधिक पाहणी केली असता त्यांना दुकानातील चांदीची वीट आणि रोख रक्कम चोरीस गेल्याचे दिसून आल्याने त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

# चक्रीवादळ निवारणाविषयी रंगीत तालीम





**अलिबाग : प्रतिनिधी**

## जिल्ह्यात ठिकठिकाणी प्रात्यक्षिके सादर

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी चक्रीवादळ निवारणाविषयी रंगीत तालीम घेण्यात आली. या वेळी प्रमुख विभागांनी आपली सज्ञता दाखवून आपल्या तयारीची प्रात्यक्षिके सादर केली.

अलिबाग तालुक्यातील वरसोली (आरसीएफ कॉलनी कुरूळ), उरण तालुक्यात केगाव तांडा, पनवेल तालुक्यात न्हावा-शेवा, मुरूड तालुक्यात वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या प्रांगण, श्रीवर्धन तालुक्यात दिवेआगर, महाड तालुक्यात दासगाव, अशा सात गावांमध्ये तसेच आरसीएफ थळ, ता. अलिबाग, ओएनजीसी कंपनी ता.उरण, पाताळगंगा एमआयडीसी पार्क-रसायनी, उरण गॅस पॉवर प्लांट ता. उरण या चार कंपन्यामध्ये तसेच धरमतर, रेवदंडा, ता. अलिबाग, उलवे ता.पनवेल, दिघी ता.श्रीवर्धन व इतर मासेमारी जेट्टीच्या ठिकाणी वादळामध्ये अडकलेल्या मच्छिमारांच्या शोध व बचावाचे कार्य करणे अनुषंगाने चक्रीवादळ आपत्ती निवारणविषयी रंगीत तालीम झाली.

या वेळी महसूल, ग्रामविकास, पोलीस, आरोग्य, पाटबंधारे, अग्नीशमन, इंडस्ट्रीयल सेफ्टी ॲण्ड हेल्थ, मत्स्यविभाग, राज्य परिवहन, सार्वजनिक बांधकाम, आपदा मित्र, भारतीय तटरक्षक, मेरीटाईम, एनडीआरएफ आदी प्रमुख विभागांनी आपली सज्ञता दाखविली.

चक्रीवादळ आपत्ती निवारणाविषयी होणाऱ्या रंगीत तालमीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालय स्तरावर दोन वेळा बैठक घेऊन विविध विभागांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर प्रत्यक्ष रंगीत तालमीवेळी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी हजर झाले होते. गावांमधून इशारा देऊन सतर्क करणे, आवश्यक साधनसामुग्रीच्या सहाय्याने जखमींना वाचविणे, जखमींना रुग्णवाहिकेपर्यंत नेणे, रुग्णवाहिकेच्या माध्यमातून आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करणे, समुद्रात असणाऱ्या व्यक्तींना लाईफ बोट, लाईफ जॅकेट, दोरी आदीच्या सहाय्याने वाचवून किनाऱ्यावर आणणे आदी प्रात्याक्षिके विविध विभागांनी या वेळी सादर केली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षात निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी जिल्हास्तरावरून या रंगीत तालमीचे नियंत्रण केले.

# खानाव ग्रामपंचायत निवडणुकीतील विजय जनतेच्या ग्रामविकास परिवर्तन पॅनेलचा!

## निलेश गायकर यांची स्पष्टोक्ती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

खानाव ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीतील विजय कोणत्याही पक्षाचा अथवा आघाडीचा नाही, तर जनतेच्या ग्रामविकास परिवर्तन पॅनेलचा आहे, असे खानाव ग्रामपंचायत निवडणुकीतील ग्रामविकास परिवर्तन पॅनेलचे मुख्य प्रवर्तक निलेश गायकर यांनी स्पष्ट केले आहे.

अलिबाग तालुक्यातील खानाव ग्रामपंचायतीत सार्वत्रिक निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत गेल्या पंचवीस वर्षांची सत्ता उलथवून टाकत ग्रामविकास परिवर्तन पॅनेलने परिवर्तन घडविले. या निवडणुकीत थेट सरपंचपदासाठी ग्रामविकास पॅनेलचे अजय नाईक हे निवडून आले, तर एकूण सदस्यांपैकी नऊ जागांवर विजय मिळवित बहुमताने विजय मिळविला, मात्र या विजयाबद्दल चुकीची प्रसिद्धी झाल्याने त्याबाबतचा खुलासा



ग्रामविकास परिवर्तन पॅनेलचे मुख्यः प्रर्वतक निलेश गायकर यांनी केला आहे.


गायकर यांनी म्हटले आहे की, खानाव ग्रामपंचायतीच्या निवडणुकीतील विजय कोणत्याही पक्षाचा अथवा आघाडीचा नाही, तर जनतेच्या ग्रामविकास परिवर्तन पॅनेलचा विजय आहे. या निवडणुकीत थोरा-मोठ्यांचे आम्ही आशीर्वाद घेतले होते. एका विचाराने एकत्र आलेल्या जनसामान्याच्या लढ्यतून ग्रामविकास परिवर्तन पॅनेल प्रचंड मतांनी निवडून आले आहे. यामध्ये थेट सरपंचपदी अजय नाईक व एकूण १४ पैकी नऊ जागांवर ग्रामविकास परिवर्तन पॅनेलचे नऊ ग्रामपंचायत सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे कुणीही याचे श्रेय घेऊ नये.

# अवकाळी पावसामुळे भातशेतीसह वीज मंडळाचेही नुकसान

**चौक : प्रतिनिधी**

ऐन दिवाळीत पाऊस पडत असल्याने शेतकरी आणि वीज मंडळाचे दिवाळे निघाले आहे. अनेक तास झाले तरी वीजपुरवठा सुरळीत सुरू झाला नाही, तर शेतकरीवर्गाच्या पिकाचे पंचनामे सुरू आहेत.

संपूर्ण पावसाच्या मोसमात पडला नाही एवढा पाऊस दुपारी तुफान वादळ-वाऱ्यासह झाल्याने मोठे नुकसान शेती, वीज वितरण कंपनी आणि घरांचे झाले आहे. गेले काही दिवस थंडीने सुरूवात केली होती, धुक्याची चादर पसरली होती. त्यामुळे पाऊस गेला असे वातावरण निर्माण झाले होते, पण मागील दोन दिवस उखाड्याने हैराण केले होते. हवामान खात्याने अंदाज वर्तविला होता. त्यानुसार भर दुपारी पावसाने गडगडणारी वीज आणि तुफान वाऱ्याने सुरुवात करुन दैना उडून दिली आहे. यामुळे कापलेली भातशेती वाहून गेली, तर उभी असलेली पाण्यात आडवी झाली आहे. वीज वितरण कंपनीचे वीजपुरवठा करणारे खांब आडवे झाले असून वाहिन्या तुटून पडल्या



आहेत. अनेक तास उलटून गेले तरी काही ठिकाणी वीजपुरवठा सुरू झाला नाही एवढी दारूण परिस्थिती निर्माण झाली आहे.

काही घरांचे पत्रे, कौले उडून मोठे नुकसान झाले आहे. गावागावात बांधकाम करण्यासाठी आणलेली वाळू, खडी वाहून गेली, तर मारलेले डेपो सिमेंटसह वाहून गेल्याने तेही नुकसान झाले आहे. चौक विभागात चौकचे मंडळ अधिकारी किरण पाटील प्रत्येक गाव सजेतील तलाठी यांच्यासह फिरून नुकसान झालेल्या पिकपाण्याची पाहणी करुन त्यानंतर दिवसभर पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे सध्या नुकसानीचा अंदाज सांगता येत नसल्याचे किरण पाटील यांनी सांगितले.

चौकचे कनिष्ठ अभियंता बोधणकर हे सायंकाळपासून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करीत असून विद्युत खांब उभे करणे लगेच शक्य नसल्याचे सांगून वाऱ्याने विद्युत वाहिन्या गुरफटून गेल्याने प्रत्येक वीजखांब बघून काम करावे लागते. अचानक वीजपुरवठा सुरू केल्यास तो पुन्हा खंडित होतो असे सांगून लवकरच वीजपुरवठा सुरळीत होईल असे सांगितले.

पुन्हा पावसाचा जोर दिसत असून ढग गडगडण्यास सुरुवात झाली आहे, त्यामुळे भीती व्यक्त केली जात आहे. झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# अंजुमन महाविद्यालयातर्फे आदिवासींना कपडे, फराळ

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा येथील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्सचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन अध्ययन शिक्षण विस्तार विभाग आणि माजी विद्यार्थी संघटना यांच्यामार्फत गुरुवारी विहूर (आदिवासी वाडी) येथे महाविद्यालाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीनिमित्त कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. नितीन पवार, प्रा. समीक्षा माळी, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. फिरोज शेख, प्रा. तमशील शहाजहान व विद्यार्थ्यामध्ये जय खानविलकर, प्रलय पाणवलकर, इमाद गजगे, इब्राहिम शेख, मतीन सुर्ती, अमीन खान, अनस रामराजकर, तमीम उलडे, मानवी नाकती, राशी शहा, श्रेया बाजी, अरफा कलबसकर, सानिया कलबसकर, रमशा कारबारी, युसूफ मांडलेकर व मुफीज शाबान यांनी मेहनत घेतली.



## माणगाव स्थानकात वृद्धाचा मृतदेह

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव बसस्थानकात ६५ वर्ष वयाच्या वृद्धाचा मृतदेह आढळल्याने शहरात एकच खळबळ उडाली. ही घटना ९ नोव्हेंबर रोजी घडली.

घटनेतील मयत महादेव गणपण तांबे (वय ६५, रा. राठिवडे, जि. सिंधुदुर्ग) हे माणगाव बसस्थानकात झोपलेल्या अवस्थेत दिसले. म्हणून खबर देणारे भाऊसाहेब नागोराव गोरपल्ले हे त्यांना उठविण्यास गेले असता त्यांची काहीएक हालचाल नव्हती. त्यामुळे त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मयत घोषित केले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे.

# शारदा मंदिर विद्यालयात दिवाळी साजरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील शारदा मंदिर मराठी माध्यम विद्यालयाच्या सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मिळून दिवाळी सण साजरा केला. या वेळी दिविजा पुरोहित यांनी दिवाळीतील प्रत्येक दिवसाचे शास्त्रीयदृष्ट्या असलेले महत्त्व सांगितले. यानंतर इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी दिवाळीतील प्रत्येक दिवसाची माहिती सांगितली. आठवी व दहावीच्या मुलींनी मिळून दिवाळीची गाणी सादर केली.

प्रत्येक इयत्तेच्या मुलांकडून विविध उपक्रम राबवून घेण्यात आतले. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे भेटकार्ड बनविणे, कागदाचे फटाके बनविणे, पणत्या रंगवणे, दिवाळी संबंधित सुंदर चित्रे काढणे, आकाशकंदिल बनविणे तसेच कागदाच्या पणत्या बनविणे हे सर्व उपक्रम मुख्याध्यापिका अंजली किसवे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले.

या कार्यक्रमाला शाळेतील मराठी



माध्यमाचे सर्व शिक्षक व शिपाई उपस्थित होते. पुरोहित यांनी सर्व मुलांकडून मनाचे श्लोक म्हणून घेतले, तर सर्व शिक्षकांनी पणत्या प्रज्ज्वलित केल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रफुल्ल देशमुख यांनी केले.

# दिवाळीनिमित्त पेणची बाजारपेठ गजबजली

**पेण : प्रतिनिधी**

दीपावली सण सुरु झाला असून पेणमध्ये दिपावली सणाची जय्यत तयारी सुरु झाली आहे. बाजारात फटाके, पणत्या, रांगोळ्या व आकाशकंदील उपलब्ध झाल्याने खरेदीसाठी लोकांची लगबग सुरु झाली असून संपूर्ण बाजारपेठ संध्याकाळी गजबजलेली दिसून येत आहे

दीपावली म्हणजे फराळाची चंगळ. या दीपावलीत विशेष मेनू काय करायचा असे मनात ठरवित गृहिणीवर्ग बाजारात त्यांना लागणारे विविध पीठ, डाळ व अन्य साहित्य खरेदी करताना दिसत आहे. सोबत रांगोळीही न विसरता घेत आहेत, तर दुसरीकडे लहान मुले किल्ला बनविण्यात दंग असले तरी यासाठी लागणारे छत्रपती शिवाजी महाराज, मावळे व अन्य मूर्ती बाजारात निवडताना दिसत आहेत. विविध फटाके जसे की, बंदुक, फुलबाजे, पाऊस, भुईचक्र असे अनेक प्रकारचे फटाके बाजारात उपलब्ध झाले असून मुले पालकांसोबत खरेदी करताना दिसत आहेत.

मातीच्या पणत्या, चायना मेड



पणत्या, विविध प्रकारचे तोरण खरेदीसाठी नागरिकांची लगबग आहे. दिवाळीत भाऊबीज येत असल्याने आताच कपडयांची पूर्व खरेदी करताना महिलावर्ग दिसत आहे. पेणमध्ये साड्यांच्या व लेडीज कपडयांच्या दूकानात खरेदीसाठी झुंबड उडालेली दिसून येत आहे.

दीपावली चांगली चविष्ट व स्वादिष्ट व्हावी यासाठी गृहिणी अनेक प्रकारचे पीठ खरेदी करण्यासाठी व संबधित डाळी खरेदीसाठी किराणा मालाच्या दुकानात दिसत आहेत. तेलासह डालडा, तूप, सुका मेवा या पदार्थाना बाजारात् मागणी दिसत आहे. दरवाढीमुळे ग्राहकांच्या खिशाला भुर्दंड बसला आहे. चणाडाळीचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. तरीही खरेदी होत आहे. एकदंरीत ग्रामीण भागासह शहरात फराळाचा गंध दरवळत आहे.

फटाके, कपडे, रांगोळी, भांडी, पणती, आकाश कंदील, मिठाईसह विविध रोषणाईच्या साहित्याची दुकाने भरलेली आहेत. पेणमध्ये ठिकठिकाणी उभे फटाक्यांचे स्टॉल, सौदर्यप्रसाधने व भेटवस्तूसाठी प्रसिद्ध असलेली दुकाने गिफ्ट, स्वीट, विविध प्रकारच्या रोषणाईच्या साहित्य आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तुच्या खरेदीसाठी दुकाने सज्ञ झाली असल्याचे पहावयास मिळत आहे. आद्योगिक क्षेत्रातील कामगारवर्ग मोठ्या प्रमाणावर पेणमध्ये वास्तव्यास असल्याने त्यांच्या दिपावलीच्या खरेदीस सुरुवात झालेली आहे. कापणीचा हंगाम सुरु असल्याने शेतकरीवर्ग ही दीपावलीसाठी सज्ञ झाला आहे. कमी अधिक प्रमाणात का होईना पेण बाजारपेठ ग्राहकांनी भरलेली दिसत आहे.

### रांगोळीच्या दरात वाढ

दिवाळीत दाराबाहेर विविध रंगाची उधळण करणारी रांगोळी हे या सणाचे खास आकर्षण. त्यामुळेच दिवाळीच्या खरेदीत कपडे, आकाश कंदील, पणती याबरोबरच रांगोळीही लक्ष वेधून घेत आहे. विविध प्रकारचे रंग बाजारात उपलब्ध असून पांढऱ्या रांगोळीबरोबरच रंगाच्या दरात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. बारीक व जाडीभरडी असे पांढऱ्या रांगोळीचे प्रकार आहेत. संस्कार भारती रांगोळी काढण्याकडे कल वाढत असल्याने व्यापारी सांगतात. रांगोळीचे रंगही महागले आहेत. रंगामध्ये गडद रंगाबरोबरच आकर्षित करणारे फ्लोरोसन्स रंगांची चलती आहे. साध्या रंगापेक्षा रांगोळीमिश्रीत रंगांना महिलांकडून तुलनेत दुपटीने मागणी आहे. राजस्थान, गुजरात यांसारख्या ठिकाणांहून रांगोळी अधिक येत आहे.

# माजी सैनिक, विधवा पत्नींना महासैनिक पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यसैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्यातर्फे सर्व डाटा संगणकीकरण करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक आणि माजी सैनिक विधवा पत्नींना व अवलंबिताना www.mahasainik.maharashtra.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी.



नोंदणी न केलेल्या सैनिक आणि संबंधित यांना महाराष्ट्र राज्यात देण्यात येणाऱ्या सुविधा मिळणार नाहीत. या नोंदणीसाठी माजी सैनिकांना १०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे, तर माजी सैनिक विधवा व अवलंबिताना हे शुल्क माफ आहे.

नोंदणीसाठी फोटो, आधार कार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत, सैन्यसेवा पुस्तक सर्व पृष्ठांची छायांकित प्रत, पीपीओ, माजी सैनिक ओळखपत्र, ईसीएचएस कार्ड, पेन्शन बँक पासबुक पहिले पृष्ठ ही ओळखपत्र आवश्यक आहेत.

सर्वांनी महासैनिक पोर्टलवर आपले नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी रायगड-अलिबाग ले. कर्नल राहुल बैजनाथ माने (निवृत्त) यांनी केले आहे.

# पाकिस्तानची आज इंग्लंडशी लढत



## वर्ल्डकप उपांत्य फेरीसाठी अशक्यप्राय समीकरण

**कोलकाता : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील शेवटच्या साखळी सामन्यात श्रीलंकेवर पाच गडी राखून दणदणीत विजय मिळविला आणि उपांत्य फेरी गाठणारा चौथा संघ म्हणून प्रबळ दावेदारी पेश केली.

या विश्वचषकात चारपैकी तीन संघ आधीच उपांत्य फेरीत पोहचले आहेत, ज्यात भारत, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांचा समावेश आहे, तर तीन संघ चौथा संघ म्हणून शर्यतीत आहेत. यात न्यूझीलंडव्यतिरिक्त पाकिस्तान आणि अफगाणिस्तान संघांचा समावेश आहे. यापैकी अफगाणिस्तान संघ यापूर्वीच स्पर्धेबाहेर गेला आहे.

न्यूझीलंड ०.७४३ असा नेट रनरेट आणि १० गुणांसह चौथ्या स्थानावर मजबूत पाय रोवून उभे राहिले आहेत. पाकिस्तान ०.०३६ असा नेट रनरेट आहे आणि त्यांना शेवटच्या लढतीत इंग्लंडविरुद्ध २८७ धावांनी विजय मिळवावा लागेल किंवा २८४ चेंडू राखून बाजी मारावी लागेल. इंग्लंडने प्रथम फलंदाजी स्वीकारल्यास पाकिस्तानचे आव्हान संपेल, कारण धावांचा पाठलाग करताना सहा षटकांत लक्ष्य पार करावे लागेल. पाकिस्तानने ४०० धावा केल्या आणि इंग्लंडला ११२ धावांवर गुंडाळले तरीही ते पात्र ठरतील.

# राज्य बॅडमिंटन स्पर्धेत आदिती यादव विजेती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

योनेक्स सनराइज यांनी पुरस्कृत केलेली ११ व १३ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य निवड बॅडमिंटन स्पर्धा नुकतीच रत्नागिरी येथे पार पडली. या स्पर्धेत उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे बॅडमिंटन प्रशिक्षक योगेश पाटील यांच्या अकादमीतील आदिती यादव हिने प्रांजल देधियाच्या साथीने १३ वर्षाखालील मुलींच्या दुहेरीत विजेतेपदाचा चषक जिंकला.



आदिती यादव हिची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डिसेंबर महिन्यात ही स्पर्धा ओडिशामध्ये होणार आहेत. या यशाबद्दल रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर, जनरल सेक्रेटरी वाय.टी. देशमुख, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी आदितीचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## दक्षिण आफ्रिकेच्या लुंगी एनगिडीला दुखापत

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या



दुसऱ्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. हा सामना १६ नोव्हेंबरला कोलकात्याच्या ईडन गार्डनवर खेळवला जाईल. या सामन्यापूर्वी आफ्रिकन संघाला मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यादरम्यान संघाचा वेगवान गोलंदाज लुंगी एनगिडी दुखापत झाली. त्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले.

अफगाणिस्तानच्या डावातील सहावे षटक टाकताना एनगिडीला डाव्या पायाच्या घोट्याला दुखापत झाली. त्यानंतर त्याला मैदान सोडावे लागले. एनगिडीला चालताना लंगडत असल्याच दिसत होते. त्याने मैदान सोडल्यानंतर एडन मार्करामने त्याचे उर्वरित षटक पूर्ण केले. भारताविरुद्धच्या सामन्यात लुंगी एनगिडीलाही हाच त्रास झाला होता. त्याची दुखापत किती गंभीर आहे याबाबत आताच काही सांगणे अवघड आहे.

# न्यूझीलंडचा फलंदाज हेन्री निकोल्सवर चेंडूशी छेडछाड केल्याचा आरोप





**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सलग चार पराभव पत्करून न्यूझीलंड संघ विजयी मार्गावर परतला आहे. श्रीलंकेविरुद्ध गुरुवारी मोठ्या फरकाने विजय मिळवून उपांत्य फेरीतील आपले स्थान जवळपास निश्चित केले आहे. पहिल्या उपांत्य फेरीत त्याचा सामना भारताशी होऊ शकतो. दरम्यान, 'किवी' संघासाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. त्याचा अनुभवी फलंदाज हेन्री निकोल्सवर चेंडूशी छेडछाड केल्याचा आरोप करण्यात आला आहे, मात्र त्याचा विश्वचषक स्पर्धेत समावेश नाही.

एकदिवसीय विश्वचषकानंतर न्यूझीलंडला बांगलादेशचा दौरा करायचा आहे. त्या संघात हेन्री निकोल्सचा समावेश आहे. न्यूझीलंडमधील प्लंकेट शील्ड या देशांतर्गत स्पर्धेदरम्यान त्याच्यावर चेंडूशी छेडछाड केल्याचा आरोप आहे. आरोप खरे ठरले, तर त्याच्या अडचणी वाढू शकतात.

प्लंकेट शील्ड स्पर्धेत (प्रथम श्रेणी स्पर्धा) कँटरबरी आणि ऑकलंड यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. निकोल्सवर हेल्मेटच्या मदतीने चेंडूशी छेडछाड केल्याचा आरोप आहे. व्हिडीओमध्ये तो हेल्मेटने चेंडू घासत असल्याचे दिसत आहे. त्याच्यावरील आरोप सिद्ध झाल्यास त्याच्यावर सहा कसोटी किंवा १२ एकदिवसीय सामन्यांची बंदी घातली जाऊ शकते.

न्यूझीलंड क्रिकेटलाही हेन्री निकोल्सच्या प्रकरणाबाबत निवेदन जारी करावे लागले आहे. आचारसंहितेच्या नियम ३.१च्या कलम १.१५चे उल्लंघन केल्याप्रकरणी हेन्री निकोल्सच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आल्याचे बोर्डाने म्हटले आहे. कँटरबरी आणि ऑकलंड यांच्यात हॅगले ओव्हल येथे झालेल्या प्लंकेट शील्ड सामन्याच्या तिसऱ्या दिवशी त्याने ही चूक केली होती.



## श्रिया भगतची राज्यस्तरीय खो-खो संघात निवड

**पनवेल : वार्ताहर**

कोएसोच्या पनवेल शहरातील इंदुबाई आ. वाजेकर इंग्रजी माध्यम शाळेत शिक्षण घेत असलेली श्रिया नरेश भगत हिची परभणी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघात निवड झाली आहे.

दिवेआगार येथे नुकत्याच झालेल्या २९व्या पुरुष व महिला रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत श्रिया भगत हिने चमकदार कामगिरी केली. यामुळे तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल शाळेचे चेअरमन व्ही.सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मानसी कोकीळ व मनीषा पाटील यांच्यासह इतर शिक्षकवर्गाने श्रियाचे अभिनंदन करून तिला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## रचिन रवींद्रने मोडला सचिन तेंडुलकरचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडसाठी सर्वांत मोठा खेळाडू ठरलेला रचिन रवींद्रने एका विक्रमाच्या बाबतीत मास्टर ब्लास्टरला सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. २३ वर्षीय रचिनने सचिनचा २७ वर्ष जुना विक्रम मोडला आहे.

रचिनने श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात एक धाव काढताच त्याने एक विशेष विक्रम आपल्या नावावर केला आहे. २५ वर्षापेक्षा कमी वयाच्या खेळाडूने विश्वचषकात सर्वाधिक धावा करण्याचा हा विक्रम आहे. सध्या हा विक्रम त्याने सचिन तेंडुलकरला मागे टाकत आपल्या नावावर केला आहे.

सचिनने १९९६च्या विश्वचषकात वयाच्या २५ वर्षापूर्वीच एका विश्वचषकात ५२३ धावा केल्या होत्या. त्याचा



हा विक्रम फार काळ कोणीही मोडू शकले नव्हते, मात्र रचिन रवींद्रने गेल्या सामन्यात या विक्रमाची बरोबरी केली होती. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत त्याने सचिनला मागे टाकले आहे.

रचिन रवींद्रचे आई-वडील क्रिकेटचे चाहते होते. त्यांना सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड खूप आवडायचे. त्यामुळेच या दोन दिग्गज फलंदाजांची नावे एकत्र करून त्यांनी आपल्या मुलाचे नाव निर्माण केले. आता रचिननेही आपले नाव सिद्ध केले आहे. सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविडची झलक त्याच्या फलंदाजीतही दिसते.









**पनवेल :** मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित दीपोत्सवाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, अजय बहिरा, एमसीसीएच सोसायटीचे अध्यक्ष राजूशेठ गुप्ते, उद्योजक मंगेश परूळेकर, आयोजक व सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंझारराव, स्वप्नील ठाकूर, प्रशांत झुंझारराव, उल्हास झुंझारराव, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर आदी उपस्थित होते. या ठिकाणी १५ नोव्हेंबरपर्यंत रात्रीच्या वेळी आकर्षक रोषणाई असणार आहे.

# वनडे वर्ल्डकपमध्ये ट्रेंट बोल्टच्या ५० विकेट पूर्ण

## जगभरातील खास गोलंदाजांच्या यादीत समावेश

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यात 'किवी' वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टने शानदार गोलंदाजी केली. या सामन्यात बोल्टने १० षटकात ३७ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. सामन्यात ट्रेंट बोल्टनेही विशेष कामगिरी केली आहे. आजपर्यंत न्यूझीलंडच्या एकाही गोलंदाजाला ही कामगिरी करता आलेली नाही. आता बोल्ट जगभरातील काही खास गोलंदाजांच्या यादीत दाखल झाला आहे.

या सामन्यात ट्रेंट बोल्टने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ६०० विकेट पूर्ण केल्या आहेत. आता बोल्टच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये ३१७, एकदिवसीय क्रिकेटमध्ये २१० विकेट्स आणि आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये ७४ विकेट्स आहेत. ट्रेंट बोल्ट बराच काळ संघातून बाहेर होता. त्यानंतर



त्याने विश्वचषकादरम्यान किवी संघात पुनरागमन केले. बोल्टची आतापर्यंतची कामगिरी चांगलीच आहे.

एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासात बोल्टच्या नावावर ५० विकेट्स आहेत. आतापर्यंत जगात असे फक्त पाच गोलंदाज आहेत, ज्यांनी एकदिवसीय विश्वचषकात ५०हून अधिक बळी घेतले आहेत. यातील बहुतांश गोलंदाजांनी क्रिकेटलाही अलविदा केला आहे. या यादीत पहिल्या स्थानावर ऑस्ट्रेलियाचा माजी दिग्गज ग्लेन मॅकग्रा आहे, ज्यांच्या नावावर ७१ विकेट्स आहेत. यानंतर श्रीलंकेचा माजी दिग्गज खेळाडू मुथय्या मुरलीधरनचे नाव दुसऱ्या क्रमांकावर येते. त्याच्या नावावर ६८ विकेट्स आहेत.

तिसऱ्या स्थानावर ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क आहे, ज्याच्या नावावर ५९ विकेट्स आहेत. चौथ्या क्रमांकावर श्रीलंकेचा माजी गोलंदाज लसिथ मलिंगा आहे, ज्याच्या विश्वचषकाच्या इतिहासात ५६ विकेट्स आहेत. याशिवाय पाचव्या क्रमांकावर पाकिस्तानचा माजी दिग्गज वसीम अक्रमचे नाव आहे, ज्याच्या नावावर ५५ विकेट आहेत. आता बोल्ट ५० विकेट्ससह सहाव्या स्थानावर आला आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com